


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

# बांधिलकी जनहिताची नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने   कार्यकारी संपादक : श्याम तिवारी




Sangamner ▪ MAHMAR/2018/75654 ▪ वर्ष ८ ▪ अंक २१९ ▪ १०/१/२०२६ (दैनिक) ▪ किंमत रु.२/- ▪ पाने ६







# संगमनेरात पुन्हा कोयता गँगची दहशत!

## शहर पोलिसांकडून तिघांवर कारवाई

**आता जाणताराजा मैदानावर धिंगाणा**

नायक वृत्तसेवा, संगमनेर

मध्यंतरी पुण्यासारख्या सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या शहरात अचानक दहशत माजवणाऱ्या कोयता गँगची चर्चा सोशल माध्यमातून गाजत असताना संगमनेरातही त्याचे लोण येवून धडकले होते. त्यावेळी शहरातील कुख्यात पावडे टोळीतील आठजणांनी श्रीरामनगर परिसरातील एका दुकानदाराला मारहाण करण्यासह कोयता हवेत फिरवून सिनेस्टाईल धमकी देत दहशत निर्माण केली होती. अर्थात त्यावेळी पोलिसांनी तात्काळ कारवाई करीत आरोपींच्या मुसक्याही आवळल्या होत्या. चार महिन्यांपूर्वी सप्टेंबरमध्ये घडलेल्या 'त्या' घटनेची गुरुवारी संगमनेरात पुनरावृत्ती झाली. यावेळी एकाने हातात कोयता मिरवत आपल्या दोघा साथीदारांसह चक्क उच्चभ्रु लोकवसाहतीचा परिसर असलेल्या जाणताराजा मैदानाजवळच दहशत निर्माण केली. सायंकाळी साडेसातच्या सुमारास अतिशय वर्दळीच्या वेळी हा प्रकार घडला. आसपास खाद्य पदार्थांच्या हातगाड्यांची रेलचेल असल्याने यावेळी अबालवृद्धांसह (पान ३ वर)



# पंचायत राज अभियानाची भाऊ कदम यांच्याकडून पाहणी

नायक वृत्तसेवा, संगमनेर



तालुक्यातील कासारा दुमाला गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकास प्रकल्पांची पाहणी करण्यासाठी मराठी सिनेसृष्टीतील अभिनेते भाऊ कदम यांनी भेट दिली. यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची (पान ३ वर)

# अधिकाऱ्याच्या पत्नीचे नग्न व्हिडीओ काढून ब्लॅकमेल!

## राहाता तालुक्यातील धक्कादायक प्रकार; एक अटकेत



नायक वृत्तसेवा, शिर्डी

राहाता तालुक्यातील एका संस्थेशी संलग्न असलेल्या एका व्यक्तीने शासकीय अधिकाऱ्याच्या पत्नीवर बलात्कार करून तिचे नग्न फोटो व व्हिडीओ चित्रीकरण करत त्याच्या आधारे ब्लॅकमेल केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राहाता पोलीस ठाण्यात बलात्कार व ब्लॅकमेलिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.ही धक्कादायक घटना राहाता शहरात घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या आरोपीस राजकीय आश्रय असल्याची चर्चा आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मनोज फकीरा कानकाटे (रा. राहाता) हा आई-वडील व लहान मुलासह एका इमारतीत भाड्याने राहत होता. पत्नीशी वाद असल्याने ती गेल्या तीन वर्षांपासून माहेरी राहत असून, मुलाची जबाबदारी आरोपीकडे होती. त्याच इमारतीत एका शासकीय (पान ३ वर)
















सुविचार : आपले लक्ष्य, साध्य विसरू नका. अन्यथा जे काही मिळाले तेवढ्यावरच संतुष्ट राहण्याची सवय लागेल. – जार्ज बर्नार्ड शॉ

# ट्रम्पशाहीचा दणका


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून रशियाकडून तेलआयात केल्याचा दंड म्हणून भारत, चीन आणि ब्राझीलवर ५०० टक्के टेरीफ आकारण्यात येऊ शकते, असे अमेरिकन सिनेट सदस्यांनी जाहीर केल्यानंतर भारतासह आशिया खंडात हाहाःकार उडाला आहे. यासोबतच ट्रम्प यांनी ६६ आंतरराष्ट्रीय संघटनांमधून बाहेर पडण्याचा जो ऐतिहासिक निर्णय घेतला आहे, त्याचे पडसाद जागतिक राजकारण, अर्थकारण आणि प्रामुख्याने भारताच्या धोरणांवर अत्यंत गंभीरपणे उमटणार आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने जोपासलेल्या जागतिक व्यवस्थेच्या अंताची ही नांदी मानली जात आहे. हा निर्णय ट्रम्प प्रशासनाच्या 'अमेरिका फर्स्ट' या धोरणाचा परमोच्च बिंदू आहे. संयुक्त राष्ट्रांच्या ३१ संस्थांमधून माघार घेऊन अमेरिकेने हे स्पष्ट केले आहे की, त्यांना आता जागतिक शांतता किंवा मानवी हक्कांच्या नावाखाली चालणाऱ्या बहुपक्षीय चर्चांमध्ये रस उरलेला नाही. हा बदल जागतिक राजकारणात 'सत्तेची पोकळी' निर्माण करणारा ठरेल. जेव्हा अमेरिका या व्यासपीठांवरून पायउतार होते, तेव्हा चीनसारख्या राष्ट्रांना आपली पकड घट्ट करण्याची आयती संधी मिळते. यामुळे येणाऱ्या काळात संयुक्त राष्ट्रांचे अस्तित्व केवळ नाममात्र राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. आर्थिक आघाडीवर ट्रम्प यांचे धोरण अत्यंत आक्रमक आणि संरक्षणात्मक आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) तत्त्वांना धाब्यावर बसवून ट्रम्प यांनी टॅरिफचा वापर एक राजकीय हत्यार म्हणून सुरू केला आहे. विशेषतः रशियाकडून स्वस्त तेल खरेदी करणाऱ्या देशांवर वाढीव आयात कर लावण्याची धमकी देणे, हे जागतिक मुक्त व्यापाराच्या मुळावर येणारे आहे. जर अमेरिकेने इतका मोठा कर लादला, तर जागतिक बाजारपेठेत वस्तूंच्या किमती गगनाला भिडतील आणि यामुळे एका नव्या जागतिक आर्थिक मंदीला सुरुवात होऊ शकते. भारतासाठी हा काळ अत्यंत कसोटीचा आहे. पंतप्रधान मोदींनी ज्या आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची (आयएसए) पायाभरणी केली, त्यातून अमेरिकेने बाहेर पडणे हा भारताच्या जागतिक नेतृत्वावर केलेला मोठा प्रहार आहे. भारताने हवामान बदलाच्या लढाईत स्वतःला 'विश्वबंधू' म्हणून प्रस्थापित केले होते, मात्र अमेरिकेच्या माघारीमुळे या मोहिमेला मिळणारे आर्थिक बळ आता संपुष्टात येईल. सर्वात मोठा धोका व्यापाराचा आहे. भारताची अमेरिकेला होणारी निर्यात सध्या २० टक्क्यांनी घटली आहे. ५०० टक्के टॅरिफ लागू झाल्यास हिरे, दागिने, औषधे आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला मोठा फटका बसू शकतो. हा निर्णय भारताच्या परकीय चलन साठ्यावर आणि औषध तसेच आयटी क्षेत्रावर थेट घाला घालणारे आहे. रशियाशी असलेली मैत्री जपायची की अमेरिकेशी असलेले व्यापारी संबंध वाचवायचे, अशा पेचात आता भारतीय मुत्सद्देगिरी अडकली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल विषयक संस्थांमधून अमेरिकेने माघार घेतल्याने पॅरिस कराराचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. विकसनशील देशांना मिळणारा हवामान निधी आता बंद होईल, ज्यामुळे भारत आणि आफ्रिकेतील देशांना हरित ऊर्जेकडे वळणे कठीण जाईल. शिवाय, महिला सक्षमीकरण आणि शांतता प्रस्थापित करणाऱ्या संस्थांमधून अमेरिकेने निधी काढून घेतल्यामुळे जगातील संघर्षग्रस्त भागांत मानवी संकट ओढवू शकते. थोडक्यात सांगायचे तर, ट्रम्प यांचे निर्णय जगाला एका अशा वळणावर घेऊन आला आहे, जिथे नियम आणि कायदे नव्हे, तर केवळ आर्थिक आणि लष्करी ताकदच सर्वश्रेष्ठ ठरणार आहे. भारताला आता आपली 'अलिप्ततावादी' भूमिका बदलून अधिक आक्रमक आणि स्वावलंबी आर्थिक धोरण राबवण्याची गरज आहे. भारताला आता केवळ अमेरिकेवर विसंबून न राहता युरोप आणि आग्नेय आशियाई देशांशी आपले संबंध अधिक दृढ करावे लागतील. रशियन तेलाबाबत भारताला मध्यममार्ग शोधावा लागेल, जेणेकरून ५०० टक्के टॅरिफची टांगती तलवार दूर होईल. 'अमेरिका फर्स्ट'च्या या युगात भारताला 'आत्मनिर्भर' होण्यासोबतच 'विश्वासार्ह जागतिक मित्र' म्हणून स्वतःला सिद्ध करावे लागेल. एकीकडे रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या युद्धाबाबत चिंता व्यक्त करण्याचा ढोंगीपणा करणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प दुसरीकडे दुसर्या देशात जाऊन तेथील अध्यक्षाला आपल्या देशात उचलून आणत आहेत ही घटना ठळकपणे उठून दिसत आहे. अमेरिकेच्या या दादागिरीबाबत जागतिक पातळीवर सर्वत्रच आवाज उठवण्याची गरज या निमित्ताने निर्माण झाली आहे. युनोच्या सुरक्षा परिषदेच्या बैठकीत अमेरिकेने अशा प्रकारची कारवाई करत असताना आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन केले नाही तर उल्लंघन केले आहे अशा प्रकारचा ठराव संमत केला असला तरी अमेरिकेने त्यालाही भीक घातलेली नाही. याबाबत जागतिक समूहाने वेळीच योग्य भूमिका घेतली नाही तर अमेरिकेची दादागिरी अजूनच वाढू शकते. एकीकडे अमेरिकेने पुन्हा एकदा ग्रीनलँड आपल्याला द्यावे अशी मागणी पुढे रेटली आहे. लॅटिन अमेरिकेतील छोट्या छोट्या देशांनाही अमेरिकेच्या या दादागिरीबाबत आता चिंता वाटू लागली आहे.

# पर्यावरण चळवळींचा पितामह

**श्रद्धांजली**

ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ हे महाराष्ट्रातील पर्यावरण चळवळींचा आधारवड म्हणून ओळखले जात होते. विकासाच्या वरवंट्याखाली सापडलेल्या पश्चिम घाटाच्या संवर्धनासाठी केंद्र सरकारला त्यांनी दिलेल्या अहवालाची बरीच चर्चा झाली. परंतु तत्कालीन केंद्र सरकारने हा अहवाल नाकारला. वास्तविक, गाडगीळ सरांनी अपार मेहनत घेऊन पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी अतिशय दूरगामी उपाययोजना या अहवालात मांडल्या होत्या. पण त्यांची शासनाने केलेली उपेक्षा खेदजनक ठरली. त्याचे परिणाम यथावकाश दिसून आले. डॉ. गाडगीळ सरांनी परिसरशास्त्र, निसर्गरक्षणशास्त्र व पर्यावरणाचा इतिहास अशा परस्परसंबंधित अभ्यासशाखांमध्ये संशोधन करण्याबरोबरच या विषयांमध्ये २०० हून अधिक शास्त्रीय लेख लिहिले आहेत. पर्यावरणप्रेमींसाठी हा मौलिक ठेवा आहे. आज संपूर्ण जग पर्यावरणाच्या दोहनामुळे झालेल्या परिणामांच्या विळख्यात अडकत चालले आहे. अशा स्थितीत डॉ. गाडगीळांसारख्या पर्यावरण चळवळींचा पितामह अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे.

**■ प्रा. डॉ. मधुकर बाचुळकर,**
**ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ**



देशाच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात पर्यावरणाच्या क्षेत्रातील अभ्यासकांविषयी फारशी आस्था दिसून येत नसले तरी डॉ. माधव धनंजय गाडगीळ यांचे नाव सर्वांच्या परिचयाचे होते. याचे प्रमुख कारण म्हणजे पश्चिम घाटासंदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिलेला अहवाल. हा अहवाल तत्कालीन केंद्र सरकारने स्वीकारला नसला तरी गेल्या पाच–दहा वर्षांमध्ये केरळ, महाराष्ट्रासह विविध ठिकाणी आलेल्या आपत्तींमुळे डॉ. गाडगीळ सरांनी केलेल्या शिफारशी किती महत्त्वाच्या आणि गरजेच्या होत्या याची जाणीव सर्वांना झाली. डॉ. माधव गाडगीळ हे अतिशय बुद्धीवंत, अभ्यासू आणि पर्यावरणाविषयीची सखोल जाण असणारे संवेदनशील पर्यावरणशास्त्रज्ञ होते. त्यांचे वडील धनंजय गाडगीळ हे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि भारताच्या नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होते. बालवयापासून निसर्गाची ओढ असल्याने त्यांची नाळ डोंगरदऱ्यांशी जोडली गेलेली होती. शालेय शिक्षणादरम्यान पुण्याच्या सभोवतालच्या टेकड्यांवर फिरणे, पक्षीनिरीक्षण करणे आणि निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करणे हा त्यांचा छंद होता. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना हाल्डेन हे डाव्या विचारसरणीचे कम्युनिस्ट जीवशास्त्रज्ञ इंग्लंड सोडून भारतात आले होते. त्यांची पुस्तके वाचून डॉ. गाडगीळ जीवशास्त्र या विषयाकडे आकर्षित झाले. त्यांना जीवशास्त्र आणि गणित या दोन्ही विषयांचे प्रेम होते, पण त्यांचा कल जीवशास्त्राकडे अधिक होता. पुणे विद्यापीठातून जीवशास्त्रात पदवी आणि मुंबई विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यावर माधवराव उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील नामवंत हार्वर्ड विद्यापीठात गेले. १९६९ मध्ये त्यांनी 'मॅथेमॅटिकल इकॉलॉजी' (गणितीय पारिस्थितिकी) या विषयात पीएच.डी. मिळवली. गणिताचा आधार घेऊन जीवशास्त्रातील कूटप्रश्न सोडवण्याचे त्यांचे कसब पाहून हार्वर्डने त्यांना तिथेच थांबण्याची विनंती केली होती. मात्र, आपल्या देशातील जैवविविधतेवर काम करण्याच्या ध्येयाने ते १९७१ मध्ये मायदेशी परतले.भारतात परतल्यावर त्यांनी बंगळुरूच्या 'इंडियन इन्स्टिटच्यूट ऑफ सायन्स' (आय.आय.एस्सी.) मध्ये काम सुरू केले. १९७३ मध्ये त्यांनी 'सेंटर फॉर इकॉलॉजिकल सायन्सेस' (सी.ई.एस.) एका सामाजिक संस्थेची स्थापना केली होती. आज ती आशियातील पर्यावरण संशोधनातील एक अत्यंत महत्त्वाचे केंद्र मानले जाते. डॉ. गाडगीळ हे प्रयोगशाळेत बसून संशोधन करणारे शास्त्रज्ञ नव्हते; तर सतत डोंगरदऱ्यांमध्ये पायी फिरून, निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या लोकांची लोकसंस्कृती, तेथील जैवविविधता, जीवसृष्टी, पशुपक्ष्यांचे अद्‌भूत विश्व यांचे अतिशय सूक्ष्म निरीक्षण करण्याचा त्यांना व्यासंग होता.

आय.आय.एस्सी.मध्ये असल्यापासून डॉ. गाडगीळ सरांशी माझे स्नेहबंध होते. सुरुवातीला आम्ही पश्चिम महाराष्ट्र, गोवा आणि उत्तर कर्नाटक या भागामध्ये असणाऱ्या पश्चिम घाटाला काही तरी दर्जा मिळावा आणि तेथील पर्यावरण, जैवविविधता टिकावी यासाठी गोवा, कर्नाटक आणि महाराष्ट्र या तीन राज्यांमध्ये पर्यावरणविषयक सामाजिक काम करणारे लोक आणि संस्था यांच्यावतीने प्रयत्न सुरू केले. यासाठी सह्याद्री इकॉलॉजिकल सेन्सिटिव्ह एरिया (सेसा) नावाचा एक प्रस्ताव तयार केला. यानिमित्ताने बंगळुरुला डॉ. गाडगीळ सरांचे मार्गदर्शन घेण्यासाठी सातत्याने भेटीगाठी होत असत. सरांना आमची संकल्पना फार आवडली होती. आमचा हा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला होता. यानंतर केंद्र सरकारने एका समितीचे गठन केले. बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडिया (बीएसआय), दिल्ली विद्यापीठातील एचओडी, झेडएसआय या सर्वांचा समावेश असणाऱ्या या कमिटीने आमची भेट घेतली. त्यांना आम्ही या संपूर्ण भागाची माहिती दिली आणि हा भाग रिझर्व्ह किंवा संरक्षित म्हणून घोषित करण्याची मागणी केली होती. कारण तेथे मोठ्या प्रमाणावर विनाश सुरू होता. या समितीने आमचे म्हणणे ऐकून घेतले. पण नंतरचे काही महिने त्यांच्याकडून कसलाच प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा डॉ. गाडगीळ सरांच्या माध्यमातून आम्ही त्यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी त्यांनी हा प्रस्ताव आम्हाला मान्य असला तरी हा तीन राज्यांमधील विषय असल्याने केंद्र सरकारचा त्याला विरोध असल्याचे सांगितले होते.

पुढील काळात केंद्र सरकारने संपूर्ण पश्चिम घाटाची वास्तवस्थिती काय आहे, हे जाणून घेण्यासाठी डॉ. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली 'गाडगीळ समिती' नेमली. त्यावेळी केंद्रात काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी लोकशाही आघाडीचे सरकार होते आणि जयराम रमेश हे पर्यावरणमंत्री होते. डॉ. गाडगीळ सरांनी गुजरातच्या पायथ्यापासून केरळपर्यंत पसरलेल्या पश्चिम घाटाच्या प्रत्येक ठिकाणी भेटी दिल्या. तेथील गावकऱ्यांशी, सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. लोकांच्या संकल्पना, मते जाणून घेतले. कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र, केरळ आणि गुजरात या सर्व राज्यांमध्ये जवळपास दोन वर्षे पायी फिरून, तेथे राहून संपूर्ण परिस्थितीचे आकलन करून आपला विस्तृत अहवाल सादर केला. कर्नाटक– महाराष्ट्रामध्ये आले असताना मी त्यांच्याबरोबर फिरून पाहणी केली. सरांनी या अहवालामध्ये माझ्या नावाचा उल्लेख केला आहे.

या अहवालामध्ये डॉ. गाडगीळ यांनी असे म्हटले होते की, संपूर्ण पश्चिम घाट हा संवेदनशील आहे. त्यामुळे काही भाग वगळता ९० टक्के पश्चिम घाट हा इकॉलॉजिकली सेन्सिटीव्ह झोन म्हणून घोषित केला गेला पाहिजे. अतिसंवेदनशील, मध्यम संवेदनशील आणि कमी संवेदनशील असे पश्चिम घाटामधील तीन भाग त्यांनी यामध्ये नमूद केले होते. यातील अतिसंवेदनशील भागामध्ये मनुष्यवावरास बंदी असावी असे त्यांनी म्हटले होते. इतकेच नव्हे त तेथे धरणांची निर्मिती केली जाऊ नये, रासायनिक शेती करु नये, रेडझोनमध्ये येणारे उद्योगधंदे इथे येता कामा नयेत अशी शिफारसही त्यांनी केली होती. मध्यम संवेदनशील भागासाठी काही अटी त्यांनी शिथील केल्या. तिथे धरणबांधणी, शेती करण्यास हरकत नाही असे त्यांनी म्हटले होते. जयराम रमेश यांनी या अहवालाला स्वीकृती आणि पसंती दर्शवली होती. या अहवालावर निश्चितपणाने विचार करू असा शब्द डॉ. गाडगीळ सरांना दिला होता; पण काँग्रेस राजवटीने ते मान्य केले नाही. कारण हा अहवाल स्वीकारल्यास पश्चिम घाटात कोणतेही विकास प्रकल्प राबवता येणे शक्य होणार नव्हते. त्यामुळे युपीए सरकारने जयराम रमेश यांना या पदावरुन हटवून जयंती नटराजन यांची त्याजागी नियुक्ती केली. यादरम्यान डॉ. गाडगीळ सरांना आम्ही अशी विनंती केली होती की, पश्चिम घाट हा सहा राज्यांमध्ये पसरलेला असल्याने केंद्र सरकारने हा अहवाल प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध करून द्यायला हवा. तत्वतः ही बाब मान्य झाली; पण हा अहवाल अतिशय लघुरुपात सादर करण्यात आला. हे सर्व होईपर्यंत डॉ. गाडगीळ समितीचा अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला आहे, असे कुठेही जाहीर करण्यात आले नाही. त्यामुळे सरांनी विविध राज्यांमध्ये जाऊन या अहवालात आपण नेमके काय म्हटले आहे, याबाबत सभा घेण्यास सुरुवात केली. कोल्हापूर, सातारा, बेळगांव येथील सभांमध्ये मीही त्यांच्यासोबत होतो. या सभांदरम्यान शासनाचे अधिकारी सरांसमोरच या अहवालाविषयीची चुकीची माहिती लोकांना देत होते. तेव्हा सरांनी त्यावर आक्षेप घेतला. ते म्हणाले की, पश्चिम घाटातील अतिसंवेदनशील भागात प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर केला जाऊ नये असे मी अहवालात लिहिले आहे, याचा अर्थ प्लास्टिक खुर्च्या वापरू नये असे कुठेही लिहिलेले नाहीये. म्हणजेच सरकारने या अधिकाऱ्यांमार्फत जनतेची दिशाभूल करण्यास सुरुवात केली होती. अखेरीस सरकारने हा अहवाल फेटाळला असल्याचे जाहीर केले. हा डॉ. माधव गाडगीळ यांना सर्वांत मोठा धक्का होता. यानंतर डॉ. कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वाखाली नवी समिती नेमली गेली. वास्तविक, ते अंतराळविज्ञानातील तज्ज्ञ आहेत. त्यांनी उपग्रहाच्या माध्यमातून पश्चिम घाटाचे सर्वेक्षण केले. यातून त्यांच्याही लक्षात आले की पश्चिम घाटात आजघडीला फक्त ३७ टक्के जमिनीवर जंगल आहे. १९४७ साली हे प्रमाण ६८ टक्के इतके होते. धक्कादायक बाब म्हणजे, या घटलेल्या प्रमाणाचे गांभीर्य लक्षात घेण्याऐवजी डॉ. कस्तुरीरंगन यांनी आपल्या अहवालात केवळ हा ३७ टक्के भागच अतिसंरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा अशी शिफारस केली. अन्य अटीही त्यांनी शिथील केल्या. पण त्यांचा अहवालही स्वीकारला आहे की नाही हे केंद्राने अद्याप जाहीर केलेले नाही.

वास्तविक, डॉ. गाडगीळ सरांनी अपार मेहनत घेऊन पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी अतिशय दूरगामी उपाययोजना मांडूनही त्यांची शासनाने केलेली उपेक्षा खेदजनक ठरली. सत्तर–ऐंशीच्या दशकात डॉ. गाडगीळ सर आणि डॉ. वर्तक यांनी जैवविविधतेचे भंडार असणाऱ्या पश्चिम घाटातील देवरायांचाही विस्तृत अभ्यास केला होता. ईशान्य भारतातील जैवविविधता पण सरांनी तिथल्या लोकांना बरोबर घेऊन अभ्यासली. परिसरशास्त्र, निसर्गरक्षणशास्त्र व पर्यावरणाचा इतिहास अशा परस्परसंबंधित अभ्यासशाखांमध्ये संशोधन करण्याबरोबरच या विषयांमध्ये २०० हून अधिक शास्त्रीय लेख लिहिले आहेत. पर्यावरणप्रेमींसाठी हा मौलिक ठेवा आहे. 'वारूळ पुराण' या पुस्तकातून डॉ. गाडगीळ सरांचा सखोल अभ्यास आणि तळमळ जाणवते. त्यांच्या पुस्तकांचे हिंदी, मराठी, कानडी, गुजराथी, मल्याळी आणि चिनी भाषांत अनुवाद झाले आहेत. भारत सराकरने डॉ. गाडगीळ यांचा पद्मश्री आणि पद्म भूषण देऊन सन्मान केला.

अलीकडच्या काळात बिबट्यांसंदर्भात त्यांनी केलेली वक्तव्येही बरीच चर्चिली गेली. बिबट्यांच्या वाढत्या मानवी हल्ल्यांच्या प्रश्नाबाबत पत्रकारांनी विचारले असता डॉ. गाडगीळ यांनी बिबट्यांच्या शिकारीला परवानगी देण्यात यावी अशी शिफारस केली होती. अनेक तथाकथित पर्यावरणतज्ज्ञांनी त्यावर टीका केली; परंतु एखादी प्रजात जर मोठ्या प्रमाणावर वाढत असेल आणि त्यावर प्रभावी नैसर्गिक नियंत्रण नसेल तर तिथे हा उपाय करणे गरजेचे आहे. आफ्रिकेसारख्या देशात सरकारकडून अशा प्रकारची परवानगी दिली जाते. यामध्ये परिपक्व नराची शिकार करण्यास सांगितले जाते, जेणेकरून त्या प्राण्याची संख्या आगामी काळात नियंत्रणात येते. गेल्या काही वर्षांत बिबट्यांची आणि गव्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे डॉ. गाडगीळ सरांनी केलेल्या शिफारसीचा शास्त्रीय दृष्ट्या विचार व्हायला हवा होता; पण तोही झाला नाही. आज संपूर्ण जग पर्यावरणाच्या दोहनामुळे झालेल्या परिणामांच्या विळख्यात अडकत चालले आहे. अशा स्थितीत डॉ. गाडगीळांसारख्या पर्यावरण चळवळींचा पितामह अनंताच्या प्रवासाला निघून गेला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

(शब्दांकन : हेमचंद्र फडके)

# उत्तीर्णांच्या गर्दीमागचा अंधार

**वास्तव**

गेल्या पाच–सहा वर्षांमध्ये महाराष्ट्रासह देशभरातील शाळा–महाविद्यालयांच्या निकालांमधील उत्तीर्णांची आकडेवारी शिक्षण क्षेत्राबाबत आशादायक चित्र निर्माण करणारी ठरत आली आहे. इतकेच नव्हे तर यशवंत विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांचा चढता आलेख अनेकांसाठी आश्चर्यकारक ठरला. विशेषतः नव्वद टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्यांची वाढती संख्या अचंबित करत आहे. अशा घवघवीत निकालांचे फलक एक–दोन शाळा–महाविद्यालयांमध्येच नव्हे तर गावोगावी, शहरातील गल्ली बोळांमध्ये सुरू झालेल्या शाळांमध्येही दिसून आले. शाळाचालकांनी यावरुन आपली पाठ थोपटून घेतली, १०० टक्के निकाल लागल्याची जाहिरातबाजी केली. यामुळे राज्य आणि देशातील एकूण शैक्षणिक स्थिती उत्तम असल्याचा आभास निर्माण झाला. परंतु केंद्रीय शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार यांनी नुकतीच एक धक्कादायक माहिती समोर आणली आहे. त्यानुसार २०२४ मध्ये देशभरातून सुमारे ५० लाख विद्यार्थी दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांमध्ये उत्तीर्ण होऊ शकलेले नाहीत. या विद्यार्थ्यांचे औपचारिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना 'मुक्त विद्यालय' प्रणालीशी जोडणे आता अनिवार्य झाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. केवळ परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे या विद्यार्थ्यांचे शिक्षण कायमचे थांबू नये, यासाठी केंद्र सरकारने 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग' च्या माध्यमातून त्यांना संजीवनी देण्याची योजना आखली आहे.

संजय कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये सुमारे २ कोटी विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते, त्यापैकी २६ लाखांहून अधिक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. बारावीच्या निकालाची स्थिती तर अधिकच बिकट असून, सुमारे ३० टक्के विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण करू शकले नाहीत. शिक्षणाच्या स्तरावरील प्रवेशाच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास असे दिसून येते की, आठवीपर्यंत प्रवेशाचे प्रमाण ९३ टक्के आहे, परंतु नववी ते बारावीपर्यंत पोहोचताना हे प्रमाण अवघ्या ६८ टक्क्यांवर येते. म्हणजेच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांची मोठी गळती होत आहे. या गळतीमागे ७२ टक्के प्रकरणांमध्ये आर्थिक अडचण आणि कामावर जाण्याची गरज ही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः मुलांमध्ये कामाच्या शोधामुळे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढले आहे, तर मुलींच्या बाबतीत घरगुती जबाबदाऱ्या हे शाळा सुटण्याचे मुख्य कारण ठरत आहे. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी एनआयओएस हा एक उत्तम पर्याय आहे. मुक्त विद्यालयाद्वारे मिळणाऱ्या प्रमाणपत्राचे मूल्य हे कोणत्याही नियमित बोर्डाच्या प्रमाणपत्राच्या बरोबरीचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नैराश्यातून शिक्षण सोडू नये, तर मुक्त शिक्षण प्रणालीचा वापर करून आपली पदवी पूर्ण करावी. सरकारचे उद्दिष्ट हे २०२६ पर्यंत बारावीपर्यंतच्या शिक्षणात १०० टक्के सकल पटनोंदणी गुणोत्तर साध्य करण्याचे आहे. ज्या मुलांना नियमित शाळेत जाणे शक्य नाही, त्यांच्यासाठी मुक्त शिक्षण हा एक सन्मानजनक मार्ग ठरत आहे.

असे असले तरी संजय कुमार यांनी मांडलेले वास्तव देशाच्या प्रगतीचा कणा मानली जाणारी शिक्षण व्यवस्था सध्या एका अत्यंत गंभीर वळणावर उभी असल्याचे दर्शवणारे आहे. दरवर्षी दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांमध्ये सुमारे ५० लाख विद्यार्थी अपयशी ठरत आहेत, ही आकडेवारी केवळ धक्कादायक नसून ती आपल्या संपूर्ण शैक्षणिक चौकटीच्या मर्यादा स्पष्ट करणारी आहे. जेव्हा इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थी परीक्षेच्या उंबरठ्यावर अडखळतात, तेव्हा तो केवळ त्या विद्यार्थ्यांचा वैयक्तिक पराभव नसून तो व्यवस्थेचा सामूहिक पराभव असतो. विशेषतः, यातील बहुतांश विद्यार्थी पुन्हा शाळेची पायरी चढत नाहीत, हे वास्तव अधिक चिंताजनक आहे. मुलींच्या बाबतीत शाळेत न परतण्याचे प्रमाण अधिक आहे, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुले घराचा भार उचलण्यासाठी मजुरी किंवा छोट्या कामांकडे वळतात. एनआयओएसने अशा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना शिक्षण अर्धवट न सोडण्यासाठी प्रोत्साहित करावे, अशी योजना आखण्यात आली आहे. मात्र, प्रश्न असा निर्माण होतो की, केवळ अशा उपक्रमांमुळे मूळ समस्येचे निराकरण होईल का? विद्यार्थी नापास का होत आहेत, याची मूळ कारणे शोधण्याचा प्रयत्न आपण गांभीर्याने करत आहोत का? केवळ चिंतेचे सूर आळवून किंवा वरवरच्या उपाययोजना करून शिक्षण व्यवस्थेतील ही दरी भरून काढणे शक्य नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी तळाशी जाऊन दुरुस्ती करणे अनिवार्य आहे.

देशातील सरकारी शाळांची अवस्था पाहिली तर शिक्षकांच्या कमतरतेचे वास्तव लपून राहिलेले नाही. अनेक राज्यांमध्ये आजही अशा शाळा आहेत ज्या केवळ एक किंवा दोन शिक्षकांच्या जिवावर चालवल्या जातात. त्यातही शिक्षकांना केवळ अध्यापनाचे काम न देता, त्यांना इतर प्रशासकीय कामांमध्ये जुंपले जाते. माध्यान्ह भोजन योजनेचे व्यवस्थापन, जनगणना, आधार पडताळणी आणि निवडणूक कामांमध्ये शिक्षकांचा वेळ आणि ऊर्जा खर्ची पडते. परिणामी, वर्गातील प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य दुय्यम ठरते. ज्या विद्यार्थ्यांचा पायाच कच्चा राहतो आणि ज्यांचा अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण होत नाही, त्यांच्याकडून बोर्ड परीक्षेत यशस्वी होण्याची अपेक्षा करणे हा त्यांच्यावर अन्यायच आहे. अशा वातावरणात विद्यार्थी अभ्यासात मागे पडत जातात आणि अखेर परीक्षेच्या वेळी अपयशाचे धनी होतात.

सरकारला या परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे, तरीही ठोस कृती आराखड्याऐवजी अनेकदा केवळ घोषणांचा पाऊस पाडला जातो. शिक्षणामध्ये गुणवत्तेचा अभाव असणे ही केवळ शिक्षकांची जबाबदारी नसून ती धोरणकर्त्यांचीही आहे. येणाऱ्या काळात अनुत्तीर्णांचे प्रमाण कमी करायचे असेल तर सरकारी शाळांमधील पायाभूत सुविधा आणि शिक्षक भरती याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागेल. एनआयओएस सारख्या संस्थांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे ही चांगली बाब आहे, परंतु मुळात विद्यार्थी नापास होणारच नाहीत अशी शिक्षण व्यवस्था निर्माण करणे हे खरे उद्दिष्ट असायला हवे. २०२६ च्या बोर्ड परीक्षेसाठी सीबीएसईने ७५ टक्के उपस्थितीची सक्ती केली आहे, मात्र उपस्थित राहण्यासाठी शाळांमध्ये सक्षम वातावरण आणि शिकवणारे शिक्षक असणे ही पूर्वअट आहे.

मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे अपयश देशाला मनुष्यबळ संकटाकडे नेऊ शकते. जर हे तरुण अकुशल राहिले आणि शिक्षणापासून वंचित राहिले, तर बेरोजगारी आणि सामाजिक विषमता अधिक वाढेल. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारांनी या विषयाकडे केवळ एक शैक्षणिक समस्या म्हणून न पाहता, आणीबाणी म्हणून पाहायला हवे. उत्तीर्णांच्या झगमगाटाआड दडलेले हे भीषण वास्तव शिक्षण क्षेत्रातील सर्वच कार्यकर्त्यांसाठी, संस्थांसाठीही महत्त्वाचे आहे. ठोस उपाययोजना, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करणे आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रमात बदल करणे या गोष्टी आता अनिवार्य झाल्या आहेत. अन्यथा, दरवर्षी प्रसिद्ध होणारे हे नापासांचे आकडे आपल्या विकासगाथेतील सर्वात मोठे अपयश म्हणून ओळखले जातील.

**– प्रसाद पाटील**

पान १ वरुन

**संगमनेरात पुन्हा कोयता गँगची दहशत!**

महिलांचीही परिसरात मोठी गर्दी असते. अशावेळी तिघांनी कोयता घेत लोकांना धमक्या भरल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांना याबाबतची माहिती मिळताच त्यांनी काही मिनिटांतच घटनास्थळावर धाव घेत तिघाही आरोपींना जेरबंद करीत त्यांच्या ताब्यातील कोयता काढून घेतला. या प्रकरणी भारतीय शस्त्र कायद्यान्वये तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी (ता.८) सायंकाळी साडेसातच्या सुमारास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना निनावी फोनद्वारे जाणताराजा मैदानाजवळ तिघेजण हातात कोयता घेवून शिवीगाळ करीत असल्याची माहिती मिळाली. शहरातील हा परिसर अतिशय उच्चभ्रु लोकवस्तीचा समजला जातो. माजीमंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगपती राजेश मालपाणी, मनीष मालपाणी यांची निवासस्थानेही याच परिसरात आहेत. त्यातच जाणताराजा मैदानापासून महामार्गाकडे जाणाऱ्या वळणावर मोकळ्या मैदानात खाद्य संस्कृती पोसली गेल्याने फास्टफ ूड व अन्य खाद्य पदार्थांच्या हातगाड्यांनी हा भाग गजबजलेला असतो. सायंकाळची वेळ म्हणजे या परिसरात मोठी गर्दी दाटलेली असते. अशावेळी कोयता घेवून तिघांकडून सुरु असलेल्या प्रकाराचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षकांनी तात्काळ आपल्या गस्तीपथकाशी संपर्क केला.

सुदैवाने यावेळी पोलिसांचे गस्तीपथक मालदाडरोड परिसरात असल्याने जाणताराजा मैदानावरील प्रकार समजताच अवघ्या काही मिनिटांतच शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. यावेळी तिघांकडून रस्त्यावर आरडाओरड व शिवीगाळ सुरु असल्याचे व त्यातील एकाच्या हाता लोखंडी पात्याचा कोयता असल्याचेही पोलिसांनी पाहिले. प्रसंगावधान राखून पोलीस कॉन्स्टेबल रामकिसन मुकरे यांनी कोयता हाती असलेल्या आरोपीला जेरबंद केले, तर उर्वरीत पथकाने त्याच्या दोघा साथीदारांना पकडून तिघानांही पोलीस ठाण्यात नेले. या प्रकरणी पो.कॉ.मुकरे यांच्या तक्रारीवरुन आरोपी समीर ज्ञानेश्वर सोनवणे (वय २४, व्यवसाय शेती), यश दत्तू सोनवणे (वय १८, व्यवसाय हॉटेल, दोघेही रा.पिंपळमळा, वेल्हाळे) व सुदर्शन संजय नवले (वय २४, व्यवसाय शेती, रा.मालदाड) अशा तिघांवर भारतीय शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत मुकरे यांच्यासह हेड कॉन्स्टेबल सातपुते, हासे, कॉन्स्टेबल पांडे, राठोड, क्षीरसागर, नागरे, खुळे आदी पोलीस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

मध्यंतरी सांस्कृतिक शहर म्हटल्या जाणाऱ्या पुण्यात अचानक कोयता गँग नावाची जमात जन्माला आली होती. हातात कोयता घेवून म नाला वाटेल त्याला धमकावण्याचे, तोडफोड करुन मारहाण करण्याचे प्रकार वाढीस लागले होते. सोशल माध्यमातील व्हायरल व्हिडिओंमधून हा प्रकार राज्यभर पसरल्याने मोठी दहशत निर्माण झाली होती. पुणे पोलिसांकडून अशा टोळ्यांच्या पायात बेड्या ठोकण्यास सुरुवात केल्यानंतर त्याचे लोण १४० किलोमीटर अंतरावरील संगमनेर शहरातही येवून पोहोचले. गेल्यावर्षी ९ सप्टेंबररोजी कुख्यात धिरज पावडे टोळीच्या सूत्रधाराने हातात कोयता घेवून श्रीराम नगरमधील शिरीष शहाणे या दुकानदारावर दहशत निर्माण केली होती.

सायंकाळच्या सुमारास सदरील दुकानदार व त्यांचा कर्मचारी बाळासाहेब भुजबळ यांना धमकावत पावडेने गल्ल्यातील दहा हजारांच्या रोकडसह मालकाच्या गळ्यातील सुवर्णहारही ओरबाडून घेतला होता. अशाच प्रकारे सायंकाळी वर्दळीच्या वेळी घडलेल्या 'त्या' प्रसंगात दुकानदाराने बाहेर जमलेल्या गर्दीला मदतीचे आवाहनही केले होते, मात्र पावडेच्या हातात लखलखता कोयता असल्याने कोणीही त्याच्या मदतीला जाण्याची हिम्मत केली नाही. उलट त्यावेळी उन्मत्त झालेल्या धिरज पावडेने हातातील कोयता हवेत उंचावून आसपास जमलेल्या लोकांना 'खबरदार, जर कोणी पुढे याल तर, त्यालाही तोडून टाकील..' अशी सिनस्टाईल धमकी भरताना दहशत निर्माण केली आणि तेथून जाताजाताही त्यांनी एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र ओरबाडून घेतले होते. त्या प्रकरणात धिरज पावडेसह त्याच्या टोळीतील दीपक वैराळ, संदीप संजय वाल्हेकर उर्फ जब्या, पिल्या घोडेकर, वरद लोहोकरे, निखिल उर्फ अजय विजय वाल्हेकर अशा आठजणांवर कारवाई केली होती. चार महिन्यानंतर पुन्हा तसाच प्रकार घडल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांनी तात्काळ कारवाई केल्याने या दहशतीवर पडदा पडला.

**अधिकाऱ्याच्या पत्नीचे नग्न व्हिडीओ काढून ब्लॅकमेल!**

संस्थेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याचे कुटुंब वास्तव्यास होते. आरोपीची पत्नी माहेरी असल्याने पीडित महिला त्याच्या मुलाची चौकशी करण्यासाठी आरोपीच्या घरात ये-जा करत होती. याच विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने महिलेला एकांतात पकडून तिचे फोटो काढले. फोटो व व्हिडीओ डिलीट करायचे असतील तर शरीरसंबंध ठेव, अन्यथा ते तिच्या पतीला दाखवून बदनामी करीन, अशी धमकी देत आरोपीने वेळोवेळी बलात्कार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून राहाता

पोलीस ठाण्यात आरोपी मनोज फकीरा कानकाटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास राहाता पोलीस करत आहेत. या घटनेमुळे शिर्डी, राहाता परिसरात खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा विकृत प्रवृत्तीविरोधात प्रशासन व पोलिसांनी कठोर भूमिका घ्यावी आणि कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**पंचायत राज अभियानाची भाऊ कदम यांच्याकडून पाहणी**

प्रभावी अंमलबजावणी व ग्रामीण भागात जनजागृती करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने अभिनेते भाऊ कदम यांची निवड करण्यात आली आहे. या अनुषंगाने त्यांनी कासारा दुमाला गावाला भेट देत विविध प्रकल्पांची पाहणी केली. यामध्ये जनार्दन जाधव यांचा मोहगणी वृक्ष लागवड प्रकल्प, तुळशीराम सातपुते यांचा गाय गोठा प्रकल्प, मीरा अभंग यांचा घरकुल प्रकल्प, रुक्मिणी महिला बचत गटाचा व्यवसाय प्रकल्प तसेच घनश्याम गुंजाळ यांचा लिंबू लागवड प्रकल्प यांचा समावेश होता.

तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सुरू असलेल्या ग्रामपंचायत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प, फिल्टर पाणी योजना, स्मशानभूमी व नदी घाट परिसराची पाहणी करून त्यांनी संबंधितांशी सविस्तर संवाद साधला. गावातील बाबाजी समाधी मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम व श्रमदानही करण्यात आले. या श्रमदानात स्वतः अभिनेते भाऊ कदम, नीलम खताळ, सरपंच राजेंद्र त्रिभुवन, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश काळे यांच्यासह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यानंतर भाऊ कदम यांनी जिल्हा परिषद शाळा व काशेश्वर माध्यमिक विद्यालयास भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ग्रामपंचायत कार्यालयासमोर आयोजित कार्यक्रमात ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कसे उपयुक्त आहे, याची सविस्तर माहिती दिली. ग्रामीण विकासासाठी लोकसहभाग आणि नियोजनबद्ध अंमलबजावणीचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

# म्हाळुंगी पुलासाठी ६ कोटींचा निधी मंजूर : आ. खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



म्हाळुंगी नदीवर वेल्हाळे गावठाण ते राजापूर रस्ता ते निमगाव भोजापूर रस्ता, गणपती मळ्याजवळ जोडणारा पूल बांधण्याच्या कामासाठी नाबार्ड ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी योजनेंतर्गत ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

यासंदर्भात माहिती देताना आमदार खताळ म्हणाले, संगमनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ, सुरक्षित आणि दर्जेदार व्हावी यासाठी गेल्या वर्षभरापासून प्रयत्न करत आहे. शासनस्तरावरून तालुक्यातील अनेक प्रलंबित रस्त्यांच्या कामांना कोट्यवधींचा विकास निधी मंजूर करून आणण्यात यश मिळाले आहे. आता वेल्हाळे-राजापूर-निमगाव भोजापूर परिसरातील नागरिकांची मागणी लक्षात घेता, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुलाच्या बांधकामासाठी ६ कोटी रुपयांचा निधी नव्याने मंजूर करण्यात आला आहे.

अनेक वर्षांपासून प्रलंबित ठेवण्यात आलेल्या या पुलाच्या होणार्या कामामुळे घुलेवाडी आणि धांदरफळ गटातील वेल्हाळे - राजापूर - निमगाव भोजापूर - गुंजाळवाडी - चिकणी या पंचक्रोशीतील नागरिकांचा प्रवास सुलभ होऊन मोठा फायदा होणार आहे. शासनाच्या विविध विभाग आणि योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या कानाकोपर्यापर्यंत विकासकामे पोहोचवण्याचा संकल्प घेऊन काम करत आहे. वेल्हाळे-राजापूर-निमगाव भोजापूर परिसरातील शेतकरी, शाळकरी मुले, ग्रामस्थ आणि प्रवाशांची गैरसोय लक्षात येताच यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सातत्याने पाठपुरावा व पत्रव्यवहार केला. त्यानुसार निधी मंजूर करण्यात आला असून लवकर पुलाचे काम सुरू केले जाणार असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

- दरम्यान, पाठपुराव्याची तत्काळ दखल घेऊन संगमनेरच्या ग्रामीण विकासाला गती देणार्या महत्वाच्या कामांना मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आमदार अमोल खताळ यांनी आभार मानले आहेत.



# श्रमसंस्कार शिबिर म्हणजे सुसंस्काराची पाठशाळा : शालिनी विखे पाटील

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**

जिल्हा परिषदेची कार्यप्रणाली आणि राष्ट्रीय सेवा योजनाची शिबिर ही परस्पर पूरक कार्य करत असतात. ग्रामस्थ व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये समाजसेवेचा कार्यकारण भाव रूजविला जातो. 'सेवेद्वारे शिक्षण' हे ब्रीदवाक्य घेऊन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करून समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व तयार केले जाते. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक जिल्हा परिषदेच्या अनेक कल्याणकारी योजनांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सदरची माहिती लोकांपर्यंत पोहोचवून प्रत्यक्ष ग्रामीण विकास कार्याला हातभार लावतात. खरे तर श्रमसंस्कार शिबिर म्हणजे सुसंस्काराची पाठशाळा असते असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या तांभेरे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिर समारोप समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून शालिनी विखे पाटील ह्या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तांभेरे विविध विकास कार्यकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष उत्तम मुसमाडे होते.

यावेळी सात्रळ महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अ‍ॅड. बाळकृष्ण चोरमुंगे, संस्थेचे संचालक अ‍ॅड. आप्पासाहेब दिघे, जे. पी. जोर्वेकर, रमेश पन्हाळे, सुभाष अंत्रे, मंदा वसंत पाटील, योगेश चोरमुंगे, चंद्रकांत पवार, काकासाहेब ढगे, बाळासाहेब मुसमाडे, बाळासाहेब बेलकर, नंदकिशोर मुसमाडे, पंढरीनाथ शेलार, लक्ष्मण गागरे, रेवजी मुसमाडे, ज्ञानदेव बेलकर, सागर मुसमाडे, अमोल हारदे, शिवा हारदे, राजेंद्र चोरमुंगे, सरपंच निशा गागरे, मेजर ताराचंद गागरे, अध्यक्ष बाळासाहेब बेलकर, माजी सरपंच मधुकर गागरे, सोपान गागरे, विलास मुसमाडे, सामाजिक कार्यकर्ते सुनील गागरे, रवींद्र कांबळे, सागर मुसमाडे, सात्रळ महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बलराज वसंत पाटील, संतोष उबाळे, पत्रकार सोमनाथ डोळे, माजी मुख्याध्यापक डॉ. अनिल लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते ऋषिकेश सरोदे, उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर, प्रो. डॉ. रामदास बोरसे, तसेच कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हाळूबाबा साबळे यांना 'हालमत संस्कृती संवर्धन पुरस्कार'!

## धनगर समाजाच्या परंपरेचा जिवंत वारसा सन्मानित



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

धनगर समाजाचा गौरवशाली, समृद्ध आणि लोकपरंपरेने नटलेला इतिहास आपल्या पहाडी आवाजातून ओव्या व वानांच्या माध्यमातून जनमानसात रुजवणारे लोकसाहित्याचे थोर उपासक तालुक्यातील मनोली (धनगर वाडा) येथील लोकसाहित्याचे उपासक म्हाळूबाबा साबळे यांना 'हालमत संस्कृती संवर्धन पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. लोककला व लोकसंस्कृतीच्या जतनासाठी आयुष्य वाहून घेतलेल्या व्यक्तिमत्त्वाचा झालेला हा सन्मान धनगर समाजासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

हा प्रतिष्ठेचा पुरस्कार सांगली येथील श्री हालमत सांप्रदाय मंडळ, कुपवाड या संस्थेच्यावतीने गेल्या नऊ वर्षांपासून प्रदान करण्यात येतो. धनगर समाजाची परंपरा, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारसा अव्याहतपणे जपणाऱ्या व्यक्तींच्या जीवनप्रवासाची सखोल पडताळणी करूनच या पुरस्कारासाठी निवड केली जाते. यंदा २०२६ साठी म्हाळूबाबा साबळे यांची निवड करण्यात आली.

कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज येथील श्री बिरदेव मंदिरात पार पडलेल्या भव्य सोहळ्यात डॉ. सुषमा सिद-पुजारी, अरुण पाटील, बाबासाहेब चौगुले, संदीप कारंडे आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, रोख रक्कम, मानाची घोंगडी, कोल्हापुरी फेटा, श्रीफळ व सन्मानपत्र असे होते. पुरस्कार स्वीकारताना म्हाळुबाबा साबळे भावूक झाले होते.

लोकसाहित्यातील वान व ओव्या गायन लोकांपर्यंत पोहोचवण्याचे अतुलनीय कार्य त्यांनी आयुष्यभर केले आहे. घरदार, प्रपंच, पैसा, वेळ आणि आरोग्य यांची पर्वा न करता बिरोबा देवाच्या यात्रा-जत्रा, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आजही ते मोठ्या उमेदीने वान-ओवी गायन करत आहेत. या प्रवासात त्यांना त्यांचे थोरले बंधू दत्तूबाबा साबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पुरस्कार वितरण सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना साबळे यांनी वीरभद्र देवाचा वान अत्यंत बहारदारपणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आधुनिक काळात मूळ परंपरा विस्मरणात जात असताना, म्हाळूबाबांसारखे लोककलेचे उपासक ग्रामीण भागात ही परंपरा जतन करण्यासाठी तळमळीने कार्य करत असल्याचे गौरवोद्गार लोकशाहीर सागर माने यांनी काढले. या सोहळ्याला त्यांचे कुटुंबीय बकचंद साबळे, शिवराम साबळे, तसेच बाळासाहेब फटांगडे, प्रा. डॉ. जी. डी. म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर व पुणे जिल्ह्यांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, लोककलेच्या क्षेत्रात हा सन्मान प्रेरणादायी ठरत आहे.

- पुरस्कार स्वीकारताना म्हाळुबाबा साबळे म्हणाले, आजवर प्रेमाने आणि निष्ठेने केलेल्या कामाची हीच खरी पोचपावती आहे. हीच माझ्या आयुष्याची खरी कमाई आहे. या पुरस्कारामुळे माझी जबाबदारी आणखी वाढली आहे. शेवटच्या श्वासापर्यंत या कलेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी माझे उरलेले संपूर्ण आयुष्य वाहून घेईन.

# स्वरा गडाखची वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यातील समनापुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत पारेगाव बुद्रुक येथील स्वरा जालिंदर गडाख ही विद्यार्थिनी किशोर गटातील वक्तृत्व स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली आहे. पर्यावरण वाचवा या विषयावर स्वरा हिने अत्यंत अभ्यासपूर्ण व प्रभावी सादरीकरण केले.

स्वरा गडाख हिची जिल्हा स्तरावर अहिल्यानगर येथे होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पारेगाव बुद्रुक शाळेतील समृद्धी अविनाश गडाख ही गोष्ट सादरीकरण या स्पर्धेत द्वितीय आली आहे.

विविध गुणदर्शन स्पर्धेत तालुकास्तरावर मिळविलेल्या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, विस्तार अधिकारी कल्याण राऊत, केंद्रप्रमुख कल्पना बिडवे, मुख्याध्यापक साहेबराव गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद गडाख, वर्गशिक्षक बाळासाहेब पाबळे, नंदू कुडेकर, यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या स्पर्धेसाठी समृद्धीला पदवीधर शिक्षक सुखदेव इल्हे, सुरेखा भालेराव, हौसाबाई घोटेकर, केशव बाळसराफ, प्रभाकर काळे, अशोक झोडगे यांचे मार्गदर्शन लाभले.



जाहिरात छोटी.....
प्रतिसाद मोठा.
जाहिरातीसाठी संपर्क-सचिन
9767007746

# संगमनेर शहर पोलिसांची कामगिरी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

शहरात सार्वजनिक ठिकाणी व बाजारपेठेत गहाळ होणाऱ्या महागड्या मोबाईलच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहर पोलिसांनी प्रभावी आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम अशी कारवाई करत ८ लाख १३ हजार रुपये किंमतीचे तब्बल ४० अँड्रॉइड मोबाईल फोन शोधून काढले. हे मोबाईल गुरुवारी एकत्रितरित्या मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले. या कामगिरीमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून शहर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिलेल्या स्थायी आदेशानुसार संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना गहाळ व हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याबाबत विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने ही मोहीम हाती घेतली. दि. १ ऑगस्ट २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत उएखठ पोर्टल व तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीतील एकूण ४० गहाळ अँड्रॉइड मोबाईल फोन शोधून काढण्यात आले.







'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अ‍ॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

# करिअर



# घर बसल्या घ्या परदेशी विद्यापीठाची पदवी



आजकालच्या धावपळीच्या युगात अनेक जण स्वीकारलेली जबाबदारी पार पाडण्याच्या तयारीत असतात. अशा स्थितीत खूपच कमी जण नियमित अभ्यासक्रम करू शकतात. आजघडीला असे काही संकेतस्थळ आहेत की ते नियमित जीवनात व्यग्र असलेल्या युवकांना ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून देतात. या संकेतस्थळावर मोफत आणि सशुल्क दोन्ही प्रकारचे अभ्यासक्रम आहेत. हे अभ्यासक्रम आपल्या सोयीनुसार करू शकतात. इथे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वेळेची कोणतिही मर्यादा नाही. हे अभ्यासक्रम कधीही सुरू करु शकतो आणि कधीही संपवू शकतो. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे आपण घरबसल्या परीक्षा देखील देऊ शकतात. परीक्षेत पास झाल्यावर प्रमाणपत्र देखील मिळू शकते. या प्रमाणपत्राच्या आधारावर आपण देश-विदेशात मोठ्या कंपनीत जॉब मिळवू शकता. ऑनलाइनवर अभ्यासक्रम पूर्ण करणे ही खूपच सुलभ आणि सोयीची बाब झाली आहे.

परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी अनेकविद्यार्थी उत्सुक असतात आणि तेथे शिकण्यासाठी प्रयत्न करत असतात. त्यातही हार्वर्ड आणि ऑक्सफर्डसारखी नामांकित विद्यापीठात प्रवेश मिळणे तसे कठिण काम. मात्र यासारख्या विद्यापीठातून घरबसल्या अभ्यास करू शकतो. यासाठी आपण इंटरनेटची मदत घेऊ शकतो. इंटरनेटवर अशा काही वेबसाइट आहेत की त्या आपल्याला ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून देतात. एवढेच नाही तर ऑनलाइन सर्टिफिकेट उपलब्ध करून देतात. यासंबंधी जाणून घेऊ या.

**ओपन कल्चर :** ऑक्सफर्ड, स्टेनफोर्ड तसेच डेल विद्यापीठासारख्या जगातील टॉप एज्यूकेशनल इन्स्टिट्यूटमध्ये ई लर्निंगचे मॅनेजिंग डायरेक्टर राहिलेले डेल कॉलमन यांनी ओपन कल्चर डॉट कॉमची सुरवात केली. या संकेतस्थळावर जवळपास १३०० ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यात आपण आवडीप्रमाणे अभ्यासक्रम निवडू शकतो. हे सर्वच अभ्यासक्रम नामांकित विद्यापीठातून चालवले जातात आणि त्यांच्यामार्फतच पदवी दिली जाते. एवढेच नाही तर या संकेतस्थळाच्या मदतीने आपण फ्री ई-बुक्स देखील डाऊनलोड करू शकतो.

**ओपन लर्निंग :** जर आपण अभ्यासाबरोबरच आणखी काही कौशल्य आत्मसात करायचे असेल तर आपण ओपन लर्निंग डॉट कॉम या वेबसाइटवर जावून आपला कस्टमाइज अभ्यासक्रम तयार करून दुसऱ्यांना शिकवू शकतो. या ठिकाणी बहुतांश अभ्यासक्रम संपूर्णपणे मोफत आहेत. मात्र इंजिनिअरिंग, सायन्ससारख्या विषयात काही अभ्यासक्रम करण्यासाठी आपल्याला शुल्क भरून नोंदणी करावी लागते. या संकेतस्थळाच्या मदतीने कोणत्या अभ्यासक्रमाला किती विद्यार्थी आहेत, हे देखील पाहू शकतो. यावरून आपण कोणत्या अभ्यासक्रमाला किती मागणी आहे, याचे आकलन करू शकतो.

**हार्वर्ड युनिव्हर्सिटी :** जगातील कोणत्याही विषयात कोणताही अभ्यासक्रम शिकण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठासारखी दुसरी कोणतीही चांगली शैक्षणिक संस्था नाही. यामुळेच onlinelearning.harvard.edu वर अनेक ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध केले आहेत. या ठिकाणी आपण कोणत्याही विषयात अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. या ठिकाणी अभ्यासक्रमाचे स्वरुप सशुल्क आणि नि:शुल्क असे आहे.

**इडीएक्स :** हार्वर्ड यूर्निव्हर्सिटी आणि मेसाच्युसेटस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीकडून संयुक्त रुपाने सुरू केलेले संकेतस्थळ ईडीएक्स डॉट ओआरजीवर आपण जगातील कोणत्याही टॉप युनिर्व्हर्सिटीचे अभ्यासक्रम ऑनलाइनवर करू शकता. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संबंधित विद्यापीठ पदवी देखील उपलब्ध करून देते. या पदवीला जगभरात मान्यता आहे.

**उदेमी :** या संकेतस्थळावर अनेक विषयाच्या सुमारे ७५ हजाराहून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्याची सुरवात ७०० रुपयांपासून होते. या ठिकाणी शिवणकामापासून रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंन्टिलिजिन्ससारख्या विषयाचे देखील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. Udemy.comमध्ये कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी बल्कमध्ये अभ्यासक्रमांची निवड करू शकतो.



# बीसीएनंतर

सध्या ऑनलाइन अभ्यासक्रमाचे युग आहे. यामध्ये अनेक जण बीसीएचा पर्याय निवडतात. तुम्हीही बीसीए करत असाल तर बॅचलर इन कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन हे विद्यार्थ्यांसाठी असा उपयुक्त अभ्यासक्रम आहे की तो संगणक विश्वाचे ज्ञान मुलांना उपलब्ध करून देतो. हा तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम संगणक तंत्रज्ञानात करियरसाठी प्रमुख आधार देण्याचे काम करतो. हा एक तांत्रिक कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम आहे. तो सी प्लस प्लस, जावा, एचटीएमएल, पीएचपी आणि संगणकाच्या अन्य मुद्द्यावरही लक्ष केंद्रींत करतो.

या अभ्यासक्रमातंर्गत एका विद्यार्थ्याला डेटाबेस व्यवस्थापनाबरोबरच प्रशासनासंदर्भात शिकवले जाते. तसे पाहिले तर विद्यार्थ्यांना कोणतेही क्षेत्र निवडताना द्विधा मनस्थिती असते. जसे की या क्षेत्रात आवड आहे की नाही, आपण या पदवीस पात्र आहेत की नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही पदवी प्राप्त केल्यानंतर भविष्यात करियरची शक्यता आहे की नाही. शेवटचा प्रश्न हा महत्त्वाचा मानला जातो. परंतु बीसीए अभ्यासक्रम केल्यानंतर करियरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत आणि त्याचबरोबर उच्च शिक्षण घेऊनही आपले करियर अधिक उंचीवरही नेऊ शकता. बीसीए केल्यानंतर करियरचे पर्याय जाणून घेऊ या.

**पदव्युत्तर पदवी :** बीसीए केल्यानंतर बहुतांश विद्यार्थी हे पदव्युत्तर पदवी करतात. जेणेकरून या क्षेत्रात तज्ज्ञ होऊ शकू. बीसीए पूर्ण केल्यानंतर आपण पुढीलपैकी कोणताही अभ्यासक्रम निवडणून उच्च शिक्षण प्राप्त करू शकतात.

**एमसीए :** एमसीए हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम आहे. तो चार सेमिस्टरमध्ये शिकवला जातो. हा संगणक शास्त्रात व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम म्हणून ओळखला जातो. या विद्यार्थ्यांना सैंद्धातिंक आणि व्यावहारिक ज्ञान प्रदान करण्याचे काम करते. चांगल्या आणि वेगवान अप्लिकेशनला विकसित करत्यासाठी नव्या प्रोग्रॅम लॅग्वेज आणि टूल्सवर भर दिला जातो. एमसीए अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात सिस्टिम मॅनेजमेंट मॅनेजमेंट इन्फॉरमेशन सिस्टिम मॅनेजमेंट, मॅनेजमेट इन्फॉरमेशन सिस्टिम (एमआयएस) , सिस्टिम (एमआयएस), सिस्टिम डेव्हलपमेंट, सिस्टिम्स इंजिनिअरिंग नेटवर्किंग ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट , सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, ट्रबलशुटिंग किंवा हार्डवेअर टेक्नॉलॉजीमध्ये प्राविण्य प्राप्त करू शकता. ही पदवी प्राप्त करून आपण कोणत्याही सॉफ्टवेअर कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर किंवा सिस्टिम इंजिनिअरची पदवी मिळवू शकते.

**एमआयएम :** एमआयएम हा एक पदवी अभ्यासक्रम आहे. तो स्ट्रॅटेजिक इन्फॉरमेशन मॅनेजमेंट, नॉलेज मॅनेजमेंट बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, इन्फॉरमेशन सिस्टिम्स, इन्फॉरमेशन आर्किटेक्चर कॉम्प्यूटर सायन्स, पॉलिसी, एथिक्स अँड प्रोजेक्ट मॅनेजमेंटमध्ये अभ्यासक्रम प्रदान करतो. ही पदवी आयटी क्षत्रात वाढत्या गरजांचे प्रतिक आहे. संगणक क्षेत्रात क्रांतिकारी बदल आणण्यासाठी ही पदवी साह्यभूत ठरत आहे.

**एमसीएम :** एमसीएम कॉम्प्यूटर आणि मॅनेजमेंटमध्ये पोस्ट ग्रॅज्यूऐशन हा पदवी अभ्यासक्रम आहे. या पदवी अभ्यासक्रमात संगणकाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवला जातो. त्याचबरोबर प्रोजेक्ट मॅनेजमेंट आणि मॅनेजमेंटशी निगडीत अन्य विषय देखील शिकवले जातात. या पदवी अभ्यासक्रमात गरजेनुसार वाणिज्यिक आणि गणिती विषयांचा देखील समाविष्ट करण्यात आला आहे. या संगणकात मॅनेजमेंटवर विशेष भर दिला जातो.

**पीजीपीसीएस :** पीजीपीसीएस हा २२ महिन्यांचा अभ्यासक्रम आहे. त्यात दुहेरी प्राविण्य मिळते. यात चार महत्त्वाच्या अटी आहेत. पहिले म्हणजे लेक्चर, दुसरे म्हणजे केस स्टडिज, तिसरे म्हणजे नाटक आणि चौथे म्हणजे सादरीकरण आणि सेल्फ स्टडिजच्या माध्यमातून कव्हर करणे. विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, कम्युनिकेशन स्किल्स, ग्रुप डिस्कशन आदी व्यक्तिमत्त्व विकास (पर्सनालिटी डेव्हलपमेंट) साठी या पदवीचा अभ्यासक्रम शिकणे गरजेचे आहे.

**एमबीए :** एमबीए हा दोन वर्षाचा व्यावसायिक अभ्यासक्रम आहे. हा बीसीए केल्यानंतर हा अभ्यासक्रम करू शकता. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बीसीएचे विद्यार्थी संगणकाबरोबर मॅनेजमेंटचे ज्ञान देखील मिळवू शकता. त्यासाठी नवीन करियरची संधी उपलब्ध हाते. बीसीए-एमबीए केल्यानंतर अनेक खासगी क्षेत्र, बिगर सरकारी संघटना यात काम करू शकतात किंवा स्वत:चा उद्योगही करू शकता.

**शॉर्ट टर्म अभ्यासक्रम :** कमी कालावधीच्या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थी मर्यादित कालावधीत गरजेनुसार कौशल्य शिक्षण आत्मसात करू शकतो. एक बीसीए पदवीधर जावा, मायएसक्यूएल, एसएपी, ओरेकल, व्हिज्युअल बेसिक्स किंवा वेब डेव्हलपमेंटमध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रम करू शकतो. जर आपण एकाचवेळी अभ्यास आणि काम करण्यास इच्छुक असाल तर हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरतो. हा अभ्यासक्रम शॉर्ट टर्म झाल्यानंतरही दिर्घकाळासाठी चांगले करियर करण्यास मदत करतात.

**खासगी क्षेत्रात नोकरीच्या संधी :** खासगी क्षेत्रात बीसीएचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांसाठी ही एक चांगली संधी आहे. कंपन्या आपल्या तंत्रज्ञानानुसार बीसीए पदवींची भरती करतात. इन्फोसिस, आयबीएम, मायक्रोसॉफ्ट,टीसीएस, टेक महिंद्रा, एचसीएल, विप्रो, असॅच्युअर, डेल, सिंटेल, ओरॅकल यासारख्या आघाडीच्या कंपन्या बीसीए पदवीधरची नियुक्ती करतात. यात विद्यार्थी सॉफ्टवेअर इंजिनिअर, सिस्टिम इंजिनिअर, हार्डवेअर इंजिनिअर, कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, नेटवर्क इंजिनिअर, कॉम्प्यूटर सिस्टिम ॲनालिस्ट, सॉफ्टवेअर डेव्हलपर आदी रुपातून नोकरी करू शकतो.


## सरकारी क्षेत्रात नोकरीच्या संधी

सरकारी क्षेत्रात बीसीए पदवीधरसाठी अनेक नोकरीची संधी उपलब्ध करून देते. जर एखादा विद्यार्थी सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असेल तर त्याला प्रोबेशनरी अधिकारी किंवा स्पेशालिस्ट आयटी ऑफिसरच्या रुपातून सरकारी बँकांत काम करू शकतो. तो स्टाफ सलेक्शन कमीशन (एसएससी) माध्यमातून सरकारी ऑफिसरच्या पदावर नियुक्ती केला जातो. त्याचबरोबर रेल्वेत सिग्नल इंजिनिअर म्हणूनही बीसीएनंतर नोकरी मिळू शकते. जर विद्यार्थी ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसेसमध्ये जाण्यास इच्छुक असेल तर तो आयएएस, आयपीएस, सीबीआय, आयआरबी, यूपीएससीच्या विविध परीक्षेत उत्तीर्ण होऊन उच्च पदावर नियुक्ती मिळवू शकतो.

## स्वयंरोजगाराच्या संधी

बीसीएनंतर विद्यार्थी आपला स्वत:चा व्यवसाय देखील सुरू करू शकतो. त्यात तो वेबसाइट डिजायनिगंग, डेटाबेस मॅनेजमेंट, डिजिटल मार्केटिंग, सॉफ्टवेअर कोडिंग, ॲप डिझायनिंग, सर्च इंजिन ऑप्टिमायजेशन आदी करू शकता. आजकाल डिजिटल युगात जावा, एचटीएमएल, एसएपी, डीबीएमएस आदींची मागणी वाढली आहे.

# अतिरिक्त अभ्यासक्रमाचे फायदे



कॉलेजमधील नियमित अभ्यासक्रम हे विद्यार्थ्यांसाठी करियर पूरक असतात. दहावी किंवा बारावीनंतर विद्यार्थी करियरसाठी एखादी शाखा निवडतात आणि त्यादृष्टीने अध्ययन करतात. जागतिक स्पर्धेत टिकवून राहण्यासाठी आणि वाटचाल करण्यासाठी पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका अभ्यासक्रम मदत करत असतात. एखाद्या विषयात, क्षेत्रात प्राविण्य, नैपूण्य आणि कौशल्य मिळवून देण्यासाठी हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना मोलाचे ठरतात. मग अभियांत्रिकी शाखा असो, वैद्यकीय शाखा, माहिती आणि तंत्रज्ञान असो, वाणिज्य, कला शाखा असो. या शाखेतील आवडीप्रमाणे किंवा स्पर्धेत टिकून ठेवणारे अभ्यासक्रम निवडून विद्यार्थी करियरसाठी सज्ज असतात. परंतु याव्यतिरिक्त नियमित अभ्यासक्रमाबरोबरच अतिरिक्त अभ्यासक्रम निवडल्यास आपल्या ज्ञानाची, विचाराची आणि करियरची संधी अधिक व्यापक होते. व्यक्तिमत्त्व आणि कौशल्य विकासासाठी पूरक अभ्यासक्रम अत्यंत मोलाचे ठरतात. कोणत्याही क्षेत्रात काम करताना अतिरिक्त ज्ञान आत्मसात केले असेल तर ते करियरला बुस्ट देणारे असते. उदा. एखाद्या व्यक्ती संगणक तज्ञ असला आणि त्याच्या अंगी वक्तृत्व किंवा लिखाण कौशल्य असेल आणि ते विकसित केले असेल तर त्याच्या करियरला ग्लॅमर प्राप्त होते. म्हणूनच अतिरिक्त अभ्यासक्रम, अध्ययनाचे काय फायदे आहेत, हे जाणून घेऊ या

**करियरला चालना मिळते :** पदवी घेणाऱ्यात दोन प्रकारचे व्यक्ती असतात. पहिले म्हणजे ते केवळ एखाद्या विषयाचे पदवीधर असतात आणि दुसरे म्हणजे पदवीबरोबरच अन्य दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची पूर्तता, एक दूरस्थ पदविका अभ्यासक्रम, नऊ कार्यशाळेतील सहभाग आणि पाच ऑनलाइन अभ्यासक्रमाला प्रवेश घेणारे व्यक्ती. साहजिकच या दोहो व्यक्तीतील फरक आपल्या लगेच लक्षात येईल. एवढेच नाही तर कोणाला अधिक वाव मिळेल, हे देखील सांगण्याची गरज नाही. निव्वळ पुस्तकी किडे असलेले किंवा पुस्तकी ज्ञान अवगत करणाऱ्याऐवजी नियमित शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांला नेहमीच प्राधान्य दिले जाईल यात शंका नाही.

**व्यक्तिमत्त्व विकास :** जर एखादा विद्यार्थी प्रोग्रॅमिंगशी निगडीत ऑनलाइन कोर्स करत असेल किंवा ॲनिमेशनशी संबंधित अभ्यासक्रम करत असेल तर त्याला नियमित अभ्यासक्रमापेक्षा अन्य क्षेत्रातील अभ्यासक्रमातून अतिरिक्त ज्ञान मिळते. कदाचित तो यात कुशल होणार नाही, मात्र या अभ्यासक्रमातून मिळालेले जुजबी ज्ञान हे समाधान देणारे, वैचारिक कक्षा रुंदावणारे भविष्यात उपयुक्त ठरू शकते. याबरोबरच परकी भाषेचे शिक्षण हे अतिरिक्त अभ्यासक्रमापैकी उपयुक्त मानले जाते. आपण जर्मन भाषेच्या ज्ञानाबरोबरच इंजिनिअर असाल आणि कामानिमित्त जर्मनीला गेला असाल तर या भाषेचे शिक्षण निश्चितच उपयुक्त ठरेल. याशिवाय फावल्या वेळेत जर्मन भाषा अध्यापनाचे काम देखील करू शकता. तांत्रिक कौशल्य आणि ज्ञान वाढल्याने आपोआपच आपला आत्मविश्वास वाढतो.

**अधिक ज्ञानसमृद्ध :** आजचे यूग मल्टिटास्किंग यूग आहे. एखाद्या कर्मचाऱ्याला, अधिकाऱ्याला एकाचवेळी अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे त्याला नियमित जबाबदारी सांभाळताना अन्य बाबी देखील हाताळता यायला हव्यात. त्यामुळे कंपनीला विविध क्षेत्रातील ज्ञान आत्मसात करणारा, अनेक आघाड्यांवर काम करणारा कर्मचारी हवा असतो. उदा. आपण जाहीरात साकारणारे कलाकार असाल आणि त्या जोडीला ग्राफिक डिझायनरचा अभ्यासक्रम पूर्ण केला तर मुलाखतकार आपल्यालाच प्राधान्य देतील. मुलाखत घेताना उमेदवाराच्या आवडी-निवडी विचारल्या जातात. आपण एखाद्या अन्य विषयात पारंगत असाल आणि कंपनीच्या धोरणाशी सुसंगत असाल तर त्या प्राविण्याची दखल घेतली जाते. म्हणूनच एकाच विषयात पारंगत असणाऱ्या उमेदवाराऐवजी अनेक विषयाचे ज्ञान बाळगून असणाऱ्या उमेदवाराची कंपनीकडून निवड केली जाते. त्याचबरोबर नोकरीदरम्यानही अनेक अभ्यासक्रम शिकण्यासाठी कंपनीकडून, संस्थेकडून सोय उपलब्ध करून दिली जाते. ते कोर्स आत्मसात केल्यास करियरचा ग्राफ आपसूक वाढतो.

आजकालच्या काळात नोकरी मिळणे आणि ती टिकवणे ही कठिण बाब झाली आहे. प्रचंड मेहनत करूनही लोकांना रोजगार मिळत नसल्याचे चित्र आहे. परिणामी त्यांच्या पदरी निराशा पडते. आजच्या काळात वेगवान, अचूक आणि कौशल्याने काम करणाऱ्या मंडळींना मागणी आहे. अशा मंडळींनाच नोकरीची अधिक संधी उपलब्ध होत असते. त्यामुळे करियर करताना काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे.

# करिअरसाठी पाच टिप्स




- **कौशल्य क्षेत्र वाढवा :** आजच्या काळात डिप्लोमा किंवा डिग्री मिळवल्याने नोकरी मिळत नाही. आपल्या अंगी असलेली प्रतिभा तपासणे आणि आपण कोणत्या क्षेत्रात तिचा अचूक वापर करतो यावर करियरची दिशा निश्चित होत आहे. म्हणून कौशल्य विकासाचा विचार करायला हवा.
- **संपर्क वाढवा :** आजच्या काळात दांडगा संपर्क करियरसाठी पूरक ठरत आहे. अधिकाधिक संपर्क राहिल्यास नोकरी मिळण्याची शक्यता अधिक बळावते. त्यामुळे आपण जास्तीत जास्त लोकांशी भेटीगाठी घ्या, संवाद साधा. आपल्याविषयी त्यांना माहिती द्या. कारण संपर्क हा नोकरी मिळवण्यातील महत्त्वाचा मुद्दा होय.
- **प्रामाणिक राहा :** प्रामाणिकपणा हा करियरमधील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. कधीही खोटे बोलू नका. प्रामाणिकपणामुळे आपल्या बढती मिळू शकते. खोटेनाटे चित्र रंगवून तुम्ही लोकांना अधिक काळ फसवू शकत नाहीत. प्रत्येक काम प्रामाणिकपणे करा.
- **तांत्रिक कौशल्य मिळवा :** जर आपल्याला चांगली नोकरी हवी असेल तर तंत्रकौशल्य आत्मसात करा. नोकरी देण्यापूर्वी आपल्याला संगणक ज्ञानाविषयी विचारले जाते. त्यामुळे शिकण्याची तयारी ठेवा. संगणक शिक्षण हे करियर साकारताना आपली प्रत्येक गरज भागवण्याचे काम करते.
- **सौजन्यपूर्ण व्यवहार :** आपल्याबरोबरच ज्यूनिअर मंडळींबरोबर चांगला व्यवहार करा. एकत्र काम केल्याने काम अचूक आणि चांगले होते. जो एकत्रपणे काम करून शिकतो, त्याला कधीही अपयश येत नाही. कारण टिमवर्कने काम करणे हाच व्यवस्थापनचा मूलमंत्र आहे.

# जिओइन्फॉर्मेटिक्सची वाढती व्याप्ती

पाकिस्तानातील दहशतवादी संघटनेने पुलवामा येथे सीआरपीएफच्या ताफ्यावर हल्ला घडवून आणला. त्यानंतर भारतीय हवाई दलाने पाकिस्तानातील बालाकोट येथे दहशतवाद्यांच्या छावण्यांवर हवाई हल्ले केले. यासाठी दहशतवादी हल्ल्याच्या छावणीची जागा किंवा तेथील छायाचित्र काढण्यासाठी जिओइन्फॉर्मेटिक्स तंत्राने मोलाची कामगिरी बजावली. भूजल पातळी असो, सामरिक स्थितीची माहिती घ्यायची असो, यासाठी जिओइन्फॉर्मेटिक्स तंत्र मोलाची कामगिरी बजावत आहे. त्यामुळे भविष्यात या शाखेचे महत्त्व वाढत जाणार आहे. जिओइन्फॉर्मेटिक्स म्हणजेच भू-माहिती विज्ञान. ही विज्ञानाची नवीन शाखा आहे. ही अनेकांसाठी नवीन संकल्पना असू शकते. परंतु गूगल मॅप्स किंवा जीपीएसशी संलग्न असलेले ॲप्स जसे ओला, उबर या गोष्टीत अनेकांना रस आहे. या सर्वांचा आधार जिओइन्फार्मेटिक्स आहे. आजच्या घडीला या क्षेत्रात असंख्य रोजगाराच्या संधी आहेत आणि हे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत चालले आहे.हे तंत्र अवगत करणाऱ्या विद्यार्थ्यांना करियरची चांगली संधी चालून आली आहे. मात्र तत्पूर्वी जिओइन्फॉर्मेटिक्स म्हणजे काय हे जाणून घ्यायला हवे. सोप्या भाषेत सांगायचे म्हटल्यास, शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने जमीनीतील आणि अंतराळातील एखाद्या बाबींचे विश्लेषण, संकल्पना करण्यासाठी केलेले अध्ययन होय. उदा. जमीन, समुद्र, मानवनिर्मित इमारती याचे जिओग्राफिक लोकशन तयार करणे. 'लॉयन' चित्रपट आठवा. त्यातील मुलगा २५ वर्षांनंतर कुटुंबाला शोधून काढतो. हे सर्व जिओइन्फॉर्मेटिक्सच्या तंत्रामुळे शक्य होते. जिओइन्फॉर्मेटिक्स हे आपल्या जीवनात वेगवेगळ्या टप्प्यावर वापरले जाते. शहरी आणि ग्रामीण भागातील नियोजन, जमीनीचा वापर, शेती, संरक्षण क्षेत्र, पायाभूत विकास संरचना यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात काम करण्यासाठी जिओइन्फॉर्मेटिक्सचा उपयोग केला जातो. मोटारीस मार्गदर्शिका, समुद्रप्रवास, हवाई क्षेत्र, नेटवर्क प्लॅनिंग आदी. जिओग्रॉफी आणि अर्थ सायन्स हे जिओाइन्फॉर्मेटिक्सवरच अवलंबून असतात.

**नोकरीची संधी**

पी अँड एस मार्केट रिसर्चनुसार २०२३ पर्यंत जीआयएस मार्केट हे १७.५ अब्ज डॉलरपर्यंत पोचेल, असा अंदाज आहे. यावरून त्याची भविष्यातील व्याप्ती लक्षात येते. जीआयएस तंत्रात कुशल तज्ज्ञांची भविष्यात गरज भासणार आहे. अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या तुलनेत या क्षेत्रातील अभ्यासक्रमाची व्याप्ती अधिक वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आजकाल प्रत्येक क्षेत्रात जीआयएस तंत्र वापरले जात असल्याने कॉर्पोरेट कंपन्या, सरकारी संस्था, हवाई, जलवाहतूक, जलसिंचन, मोटार कंपन्या, संरक्षण क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, हवामान आणि पर्यावरण विभाग, आपत्कालिन विभाग, भूगर्भ माहिती विभाग, जलव्यवस्थापन आदी ठिकाणी या क्षेत्रातील तज्ज्ञांना मागणी राहणार आहे. सर्व क्षेत्रांना कोणताही प्रकल्प सुरू करताना जमीनीचा डेटा हवा असतो. हा डेटा उपलब्ध करून देण्याचे काम जिओइन्फॉर्मेटिक्स तज्ज्ञ करत असतात.

**पात्रता :** जिओइन्फॉर्मेटिक्समध्ये पदवी मिळवण्यासाठी ५५ टक्क्यांसह बारावी उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. देशातील निवडक विद्यापीठ आणि महाविद्यालय जिओइन्फॉर्मेटिक्सचा अभ्यासक्रम शिकवतात. त्याचबरोबर जिआग्रोफी, जिओलॉजी, पर्यावरण शास्त्र, केमिस्ट्री किंवा फिजिक्सचे ज्ञानही मिळवू शकतात. या क्षेत्रात पदवी, पदव्युत्तर पदवी आणि उच्चशिक्षणही मिळवू शकतात. पदवी किंवा पदव्युत्तर पदवी मिळवल्यानंतर विद्यार्थी हा रिसर्चशी निगडीत नोकरीसाठी अर्ज करू शकतो. याशिवाय जिओइन्फॉर्मेटिक्समध्ये डॉक्टरेटही मिळवता येते. जिओइन्फॉर्मेटिक्समध्ये उच्च शिक्षण किंवा डॉक्टरेटसाठी शासकीय अनुदान किंवा शिष्यवृत्ती देखील दिली जाते.



**पॅकेज रु** या क्षेत्रात जीआयएस प्रशिक्षणार्थी म्हणून करियरला सुरवात करता येते. त्याचे वेतन दोन लाखांपासून सुरू होते. खासगी आणि सरकारी क्षेत्रात दोन ते तीन लाखांपासून वेतन मिळते. जसजा अनुभव वाढत जाईल तसतसे वेतनात वृद्धी होत राहते. अन्य व्यवसायिक क्षेत्राच्या तुलनेत जीआयएस क्षेत्रात चांगल्या वेतनाने सुरवात होत असल्याचे दिसून येते.

**रोजगाराची व्याप्ती :** जिओइन्फॉर्मेटिक्स तंत्रात अनेक क्षेत्र व्यापलेले दिसून येतात. सार्वजनिक क्षेत्र ते खासगी क्षेत्रात विविध टप्प्यावर जीआयएस तंत्रज्ञांची गरज भासते. उच्चविभूषित जिओइन्फॉर्मेटेक्सला उच्च पदावर काम करण्याची संधी मिळते. शेती, आयटी क्षेत्र, हवाई वाहतूक यात जीआयएस तज्ञांची गरज भसते. इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायजेशन, वेगवेगळे स्पेस अप्लिकेशन सेंटर आणि एव्हिशन सेंटरमध्ये देखील जीआयएस तंत्रज्ञांची गरज भासते. शहर आणि ग्रामीण विकासासाठी योजना आखताना, धरण बांधताना, विकासकामे राबवताना जीआयएस तंत्रज्ञ हवे असतात. एकंदरित जिओइन्फॉर्मेटिक्स हे दिर्घकाळ चांगले करियर करण्याची संधी उपलब्ध करून देते.

# लाडकी बहीण योजनेतून १७,९६७ महिलांना वगळल्याने संगमनेरात नाराजी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने सुरू केलेल्या ‘लाडकी बहीण’ योजनेमुळे राज्यातील महिलांमध्ये मोठी अपेक्षा निर्माण झाली होती. संगमनेर तालुक्यातही या योजनेचा लाभ मिळावा यासाठी राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात आले. या कार्यालयातून तालुक्यातील सुमारे ९० हजार महिलांचे ‘लाडकी बहीण’ योजनेचे अर्ज भरून त्यांना प्रत्यक्ष लाभही मिळवून देण्यात आला. मात्र, नुकतेच सरकारने विविध कारणे पुढे करत १७,९६७ महिलांना या योजनेतून वगळल्याने तालुक्यातील महिलांमध्ये तीव्र नाराजी पसरली असल्याची माहिती महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अर्चना बालोडे यांनी दिली.

संगमनेर तालुका हा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित तालुका म्हणून ओळखला जातो. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावा, यासाठी यशोधन कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जातो. महायुती सरकारने २०२४ मध्ये ‘लाडकी बहीण’ योजना जाहीर केल्यानंतर तालुक्यातील महिलांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी यशोधन कार्यालयातील यंत्रणेने रात्रंदिवस काम केले. त्यातून सुमारे ९० हजार महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून डिसेंबर २०२५ पर्यंत महिलांना नियमितपणे रक्कमही मिळत होती.

> ■ निवडणुकीपूर्वी महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र ते पैसे तर दिलेच नाहीत, उलट सुरू असलेल्या योजनेतून आम्हाला वगळण्यात आले आहे. आम्ही गरीब असतानाही आमच्या नावापुढे ‘सरकारी नोकरी’ असा शेरा येत आहे. हा नेमका काय प्रकार आहे, हेच कळत नाही. हा गरिबांना फसवण्याचा प्रकार आहे, अशी तीव्र टीका तालुक्यातील वडगाव पान येथील मीना थोरात येथील शेतकरी महिलेने केली आहे.

मात्र, आता अचानक सरकारने विविध कारणे दाखवून १७,९६७ महिलांना या योजनेतून वगळले आहे. याचबरोबर निवडणुकीपूर्वी महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. हे आश्वासनही पूर्ण झाले नसून, उलट महिलांना मिळत असलेल्या रकमेत कपात करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक महिलांना शासकीय कार्यालयांचे सातत्याने हेलपाटे मारावे लागत आहेत.

अनेक महिलांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही त्यांना योजनेचा लाभ मिळत नाही. तर अनेक गरीब महिलांच्या नावासमोर पोर्टलवर ‘सरकारी नोकरी’ असा शेरा येत असल्याने त्या महिलांना अपात्र ठरवले जात आहे. प्रत्यक्षात या महिला अत्यंत गरीब असून त्यांचा सरकारी नोकरीशी कोणताही संबंध नसतानाही तांत्रिक त्रुटींमुळे त्या योजनेपासून वंचित राहत आहेत. परिणामी, पात्र व गरजू महिलांना ‘लाडकी बहीण’ योजनेचा लाभ मिळत नसल्याने सरकारविरोधात तीव्र असंतोष व्यक्त केला जात आहे.

महायुती सरकारने केवळ निवडणुकीपुरत्याच या घोषणा केल्या असून आता हळूहळू महिलांना योजनेतून वगळले जात असल्याचा आरोप महिला काँग्रेसने केला आहे. संगमनेर तालुक्यात या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणावर नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## राजुरमध्ये निर्भय कन्या अभियान शिबिर उत्साहात

**नायक वृत्तसेवा, राजुर**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि येथील ॲड. देशमुख महाविद्यालय विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निर्भय कन्या हे अभियान शिबिर उत्साहात पार पडले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राजुर पोलीस स्टेशनच्या महिला कॉन्स्टेबल श्रीमती सुवर्णा शिंदे-तांबे यांनी आधुनिक कालखंडातील स्त्रियांच्या कर्तुत्वाचे दाखले देऊन, कर्तुत्ववान स्त्रियांचा इतिहास, त्यांचे कार्य मुलींसमोर मांडले. मुलींनी स्वतः चे संरक्षण करण्याबरोबरच आपले कुटुंब, समाज यांचे संरक्षण केले तर समाज निकोप होईल. स्त्रियांसाठी अनेक कायदे आहेत, त्या कायद्याचा आधार स्त्रियांनी घ्यावा असे मत यांनी मांडले. तसेच राजूर पोलीस स्टेशनच्या वतीने महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या सप्ताहाच्या निमित्ताने राजुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी यावेळी उपस्थितांना शस्त्रांच्या बद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले. शिबिराच्या प्रथम सत्रात कराटे गोल्ड मेडल विजेता यांनी शिबिरार्थीना कराटे प्रशिक्षण दिले. या शिबिर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. वाल्मिक गिते यांनी केले तर आभार डॉ. लहू काकडे यांनी मांडले. यावेळी श्रीमती सीमा कानवडे(विशेष शिक्षिका), महिला पो.कॉ. श्रीमती राहटळ , प्रा. कुसमुडे , नर्शिंग कॉलेजचे प्राचार्य सुदर्शन तांबे, उपप्राचार्य सौरभ जाधव उपस्थित होते.

## अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांची दुबईमधील कंपनीत निवड

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तेतून राज्यात अग्रगण्य ठरलेल्या अमृतवाहिनी आयटीआय मधील सहा विद्यार्थ्यांची दुबई येथील कंपनीत चांगल्या पगारावर निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य विलास भाटे यांनी दिली.

दुबई येथील जी बी एम टी स्टील सर्विसेस या कंपनीचा कॅम्पस इंटरव्यू अमृतवाहिनी आयटीआय मध्ये पार पडला. यावेळी कंपनीचे जनरल मॅनेजर सतीश खुळे व प्रोडक्शन हेड प्रमोद आवारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी इलेक्ट्रिशियन व फिटर ट्रेडच्या विद्यार्थ्यांची इंटरव्यू घेतली. यामधून सहा विद्यार्थ्यांची मोठ्या पॅकेजवर निवड झाली आहे. कॅम्पस इंटरव्यू मुळे अनेक विद्यार्थ्यांना नोकरीच्या सध्या उपलब्ध होत असून देशाबाहेर अमृतवाहिनीतील संस्थेने आपल्या यशाचा झेंडा फडकवला आहे.

इलेक्ट्रिशनच्या या यशाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे ,मॅनेजर प्रा. विवेक धुमाळ, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव ,प्राचार्य विलास भाटे, नामदेव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## ललित कला स्पर्धेत प्रवरा माध्यमिक विद्यालयाचे यश

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**




लोकनेते बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित )प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था प्रवरानगर व प्रवरा कला अध्यापक संघ आयोजित पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ललित कला स्पर्धेत संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील प्रवरा माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण लोणी येथील गंगुबाई इंडोर स्टेडियम प्रवरा कन्या विद्यामंदिर येथे पार पडले. या पारितोषिक वितरण समारंभासाठी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेच्या कार्यकारी अधिकारी सुष्मिता विखे पाटील व संस्थेच्या संचालिका( माध्यमिक विभाग) लिलावती सरोदे यांच्या हस्ते पार पडले. या मध्ये प्रवरा माध्यमिक विद्यालय,झरेकाठी येथील ८ वी ते १० वी या गटात चित्रकला स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवलेली विद्यार्थिनी कु.पूजा शरद वाणी तसेच ५ वी ते ७ वी या गटामध्ये हस्ताक्षर स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक कु.समृद्धी अमोल हारदे व तालुक्यामधून चित्रकला स्पर्धेत ८ वी ते १० वी गटामध्ये प्रथम क्रमांक चि. यश गंगाधर वाणी ५ वी ते ७ वी गटामध्ये चित्रकलेमध्ये प्रथम क्रमांक कु.साईशा सुनील वाणी या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील कलाशिक्षक मनोज पवार यांचे मार्गदर्शन लाभले. पारितोषिक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे

शालेय स्कूल कमिटीचे अध्यक्ष ॲड. पोपट वाणी, गोकुळ वाणी, शिवाजी वाकचौरे, प्रा. विलास वाणी, भिकाजी वाणी, पोपट आनंद पाटील, प्रा. रामचंद्र डोळे, उद्योगपती लक्ष्मण डोळे, सोमनाथ नाईकवाडी, बाळासाहेब डोळे,मधुकर वाणी, सुदाम वाणी, सोमनाथ डोळे, गोरख वाणी, मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाची धडाकेबाज कामगिरी!

### ६ लाखांचे ५२ गहाळ मोबाईल शोधून मूळ मालकांच्या ताब्यात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




गहाळ किंवा चोरीस गेलेले मोबाईल शोधणे कठीण मानले जात असताना श्रीरामपूर विभागातील (अहिल्यानगर उत्तर विभाग) पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून उल्लेखनीय कामगिरी करत तब्बल ६ लाख रुपये किंमतीचे ५२ मोबाईल फोन शोधून काढत ते त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात परत केले आहेत. या कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्रीरामपूर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विविध ठिकाणांहून वेगवेगळ्या कंपन्यांचे महागडे मोबाईल गहाळ झाल्याबाबत नागरिकांनी तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारींच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर कार्यालयाने विशेष मोहीम हाती घेतली. गहाळ मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण, आयएमईआय ट्रॅकिंग व सायबर तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसांनी हे मोबाईल शोधून काढले.

श्रीरामपूर शहर, राहुरी, अकोले, आश्वी, संगमनेर, राजूर आदी भागांतील नागरिकांचे विवो, सॅमसंग, ओपो, वन प्लस, रेडमी, रियलमी, मोटोरोला, नथिंग आदी कंपन्यांचे मोबाईल या मोहिमेत हस्तगत करण्यात आले. काही मोबाईलची किंमत दोन हजारांपासून वीस-पंचवीस हजार रुपयांपर्यंत असून एकूण किंमत सुमारे ६ लाख रुपये आहे.

गहाळ मोबाईलचा वापर सायबर गुन्हेगार व अन्य गुन्हेगारांकडून विविध गुन्ह्यांसाठी केला जाण्याची शक्यता असते. तसेच डिजिटल पुरावे टाळण्यासाठी व मूळ मालकांना अडचणीत आणण्यासाठीही अशा मोबाईलचा गैरवापर होतो. त्यामुळे नागरिकांनी आपल्या मोबाईलची योग्य ती काळजी घ्यावी, गहाळ झाल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी, असे आवाहन अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्याकडून करण्यात आले आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत श्रीरामपूर शहराचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्यासह अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी विशेष परिश्रम घेतले. गहाळ मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत श्रीरामपूर विभागातील पोलिसांचे आभार मानले असून, ही कारवाई इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

नायक ANCHOR

## नायलॉन मांजाची खरेदी-विक्री टाळा : अमृता कोळपकर

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बंदी असलेल्या नायलॉन मांजाची विक्री व खरेदी पूर्णतः टाळावी, असे आवाहन राष्ट्रवादी (अजित पवार गट) काँग्रेसच्या वक्ता सेलच्या राज्य उपाध्यक्षा अमृता कोळपकर यांनी केले आहे.

सणाच्या उत्साहात काही ठिकाणी दुकानदारांकडून बंदी असलेला जीवघेण्या मांजाची विक्री होत असल्याच्या तक्रारी येत असून, यामुळे नागरिकांसह पक्षी, जनावरे यांचे जीव धोक्यात येत आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

नायलॉन मांजा अतिशय तीक्ष्ण व मजबूत असल्याने पतंग उडविताना अनेक अपघात घडल्याचे प्रकार यापूर्वीही समोर आले आहेत. दुचाकीस्वार, पादचारी यांच्या गळ्याला, हाताला गंभीर इजा होण्याचे तसेच पक्ष्यांचे पंख कापले जाण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे या मांजावर बंदी घातलेली असतानाही काही ठिकाणी दुकानातून सर्रास विक्री होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

कोळपकर म्हणाल्या, मकर संक्रांती हा आनंदाचा सण आहे. मात्र या आनंदात कोणाच्याही जीवाला धोका निर्माण होता कामा नये. नायलॉन मांजा पूर्णतः टाळून केवळ कागदी, सूती किंवा पर्यावरणपूरक दोरा वापरावा. दुकानदारांनी कायद्याचे पालन करून बंदी असलेला मांजा विक्री करू नये आणि नागरिकांनीही ती खरेदी न करता सामाजिक जबाबदारी दाखवावी.यासोबतच त्यांनी प्रशासनालाही सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तालुक्यातील बाजारपेठांमध्ये तपासणी मोहीम राबवून बंदी असलेल्या मांजाची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच सामाजिक संस्था, युवक मंडळे यांनी जनजागृती करून सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.दरम्यान, काही ठिकाणी दुकानातून अद्यापही बंदी असलेल्या जीवघेण्या मांजाची विक्री होत असल्याचे प्रकार समोर येत असल्याने नागरिकांनी सतर्क राहून अशा विक्रेत्यांची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहनही कोळपकर यांनी केले आहे. सुरक्षित पतंगोत्सव साजरा करून मकर संक्रांतीचा आनंद सगळ्यांनी मिळून घ्यावा, असे त्यांनी शेवटी नमूद केले.

## दत्त महाराज दिंडीचे राठी परिवाराने केले स्वागत

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



ज्ञानबा-तुकाराम, ज्ञानोबा-तुकाराम औदुंबर श्री गुरुदेव दत्त दत्तमहाराज की जय संत निवृत्तीनाथ महाराज की जय अशा जयघोषात श्रीक्षेत्र अकलापूर ते श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर पायी दिंडी सोहळ्याचे संगमनेर शहरात स्वागत करण्यात आले.

तालुक्यातील पठार भागातील श्रीक्षेत्र अकलापूर ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर संत निवृत्तीनाथ महाराज रथ-पालखी पायी दिंडी मंगळवारी अकलापूर येथील दत्त महाराजांचे दर्शन घेऊन त्र्यंबकेश्वरच्या दिशेने मार्गस्थ झाली. या दिंडी सोहळ्यात परिसरातील असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तालुक्यातील झोळे येथील बादशहा कारभारी नवले यांच्या निवासस्थानी सर्व भाविकांनी महाप्रसाद घेऊन दिंडी संगमनेरच्या दिशेने रवाना झाली. गुरुवारी सकाळी संगमनेर शहरातील जाणता राजा मैदान परिसरात राठी परिवाराच्या वतीने तसेच सुप्रभात आणि श्रीराम बालाजी ग्रुप, संगमनेरच्या वतीने या दिंडीचे रांगोळी काढून तसेच वारकरी व दत्त महाराज पालखीवर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यावेळी अमित आणि सचिन राठी परिवाराच्यावतीने वारकऱ्यांचे पाय धुवून दर्शन घेण्यात आले. त्यानंतर राठी परिवाराच्या वतीने महाआरती करण्यात आली. दिंडीतील भाविकांसाठी राठी परिवाराच्यावतीने चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्या नंतर ही दिंडी त्र्यंबकेश्वरच्या दिशेने मार्गस्थ झाली.

यावेळी तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी सपत्नीक दत्त महाराज पालखीचे दर्शन घेत शुभ आशीर्वाद घेतले. कार्यक्रमास साई प्रसाद कॉलनीतील भाविक भक्त, अमित राठी मित्रपरिवार तसेच शहरातील अनेक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.भाविकांच्या सहभागामुळे व भक्तीमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर दत्तनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता.

पाहिजेत
Dr. R. S. Gunjal welfare foundation
College of nursing

| अ. नं. | पद | जागा |
|---|---|---|
| १) | Principal (M.Sc Nursing with 15 year teaching experience, PHD is Desirable ) | 1 |
| २) | Tutor (B.Sc Nursing) | 4 |
| ३) | Staff Nurs (B.Sc Nursing) | 2 |
| ४) | Driver (Ladies) | 1 |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर Mb :- 8237660432 / 8468816440

बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अ‍ॅण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर



लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून राजेन्द्र विश्वासाची सार्थ परंपरा...

# जुन्या कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्र आणणारा विश्वासाचा दुवा!

## पांडुरंग घुले यांच्या भूमिकेमुळे सहकार चळवळीत नवचैतन्य



गोरक्षनाथ मदने

**संगमनेर : सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन पांडुरंग दामोदर घुले यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर कारखान्याच्या परिसरात जुन्या, जाणत्या कार्यकर्त्यांची उपस्थिती वाढताना दिसत आहे. भाऊसाहेब थोरात उर्फ दादा यांच्या निधनानंतर त्यांच्या समवयस्क व सहकार चळवळीत आयुष्य घालवलेल्या कार्यकर्त्यांना जाणवणारी नेतृत्वाची पोकळी पांडुरंग घुले यांच्या माध्यमातून भरून निघत असल्याचे चित्र आहे.**

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दादांच्या पश्चात संघटना सांभाळण्याचे महत्त्वाचे काम केले. मात्र, दादांच्या काळातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांची उपस्थिती कार्यक्रमांमध्ये तुलनेने कमी दिसत होती. दादांसोबत दीर्घकाळ काम केलेल्या पांडुरंग घुले यांना साखर कारखान्याच्या व्हा. चेअरमनपदाची संधी मिळाल्यानंतर मात्र, परिस्थितीत बदल झाला आहे.

दुपारच्या निवांत वेळेत दादांच्या काळातील अनेक जुने सहकारी, सवंगडी आणि कार्यकर्ते पांडुरंग घुले यांच्या केबिनमध्ये एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा देताना दिसतात. आलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याशी आपुलकीने संवाद साधणे, चहापाणी करून मानसन्मान देणे, ही त्यांची कार्यपद्धती असल्याने जुन्या पिढीतील कार्यकर्ते पुन्हा सक्रिय होत आहेत. परिणामी, सहकारी संस्थांमध्ये नव्याने चैतन्य निर्माण झाले आहे.

प्रत्येक पिढीतील कार्यकर्ते आपल्या समवयस्क नेतृत्वासोबत अधिक मोकळेपणाने संवाद साधतात, हे लक्षात घेता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी पांडुरंग घुले यांना दिलेली संधी संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वाची ठरत आहे. गावोगावचे जुने कार्यकर्ते पुन्हा सहकार चळवळीत सहभागी होत असून, त्यांच्या अनुभवाचा व मार्गदर्शनाचा लाभ संस्थांना मिळत आहे. भाऊसाहेब थोरात यांनी सहकार चळवळीला दिलेल्या योगदानाबद्दल समाधानाची भावना अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते.

उतारवयात पैसा किंवा पदापेक्षा प्रेमाने बोलणं, आपुलकी आणि मानसन्मान याला अधिक महत्त्व असते. पांडुरंग घुले यांच्या माध्यमातून ही गरज पूर्ण होत असल्याने अनेक जुने कार्यकर्ते पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत.

दरम्यान, आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. गावोगावच्या कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, पांडुरंग घुले तसेच विविध सहकारी संस्थांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि पदाधिकारी संयुक्तपणे बैठका घेत आहेत. जुने व नवे कार्यकर्ते यांची सांगड घालत जिल्हा परिषद व पंचायत समितीवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मंत्रीपदाच्या कार्यकाळात गावोगाव वेळ देणे शक्य नव्हते मात्र विधानसभेतील परिवर्तनानंतर बाळासाहेब थोरात नियमितपणे विविध गावांना भेटी देत आहेत. जुन्या कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन त्यांचे मनोबल वाढवणे, प्रलंबित प्रश्न आणि कामे मार्गी लावणे यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. आता माझ्याकडे वेळ आहे. तुमच्या सुख-दुःखात, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात मी उपस्थित राहीन, अशी ग्वाही बाळासाहेब थोरात गावोगाव देत आहेत. दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख तसेच विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी यांच्यावर जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्याने संघटना बांधणीचे काम अधिक गतिमान झाले आहे.

या सर्व घडामोडींमुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये काँग्रेसला बळ मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांमधुन व्यक्त होत असून सहकार व राजकारण या दोन्ही पातळ्यांवर नवचैतन्य दिसून येत आहे.



संगमनेर : पत्रकार दिनानिमित्त आयोजित पुरस्कार समारंभात संगमनेरचे प्रसिद्ध व्यक्तिमत्व लुकड्या पैलवान यांना पुरस्कार देताना राष्ट्रीय पत्रकार संघाचे अध्यक्ष महेंद्र देशपांडे, जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ पगार तसेच अभिनेत्री प्रिया चौधरी दिसत आहेत.

शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर
(महाराष्ट्र शासन व एनसीटीई मान्यता प्राप्त)
अध्यापक विद्यालय (डी.एल.एड्.), संगमनेर
NCTE Code No.APW/05606/1221545 NCTE No.WRC/5-6/99th/2007 Dt.28/12/2007
संगमनेर कॉलेज कॅम्पस्, घुलेवाडी, ता.संगमनेर, जि.अ.नगर दूरध्वनी - ०२४२५-२२२८६९
पाहिजेत
शैक्षणिक वर्ष 2025-26 या वर्षाकरिता संस्थेच्या मराठी माध्यम डी.एल्.एड्. विद्यालयाकरिता (कायम विनाअनुदानित) खालील पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक व पात्र उमेदवारांनी स्वहस्ताक्षरातील अर्ज सोमवार दि. 19/01/2026 पर्यंत वरील पत्त्यावर कार्यालयात जमा करावेत. सोबत शैक्षणिक पात्रतेच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या | अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | पायाभूत अभ्यासक्रम विषय अधिव्याख्याता | एम.ए./एम.एस्सी., एम.एड्. (बी+) | 01 | – |
| 2 | शालेय विषय अध्यापन पद्धती अधिव्याख्याता (मराठी/हिंदी/इंग्रजी, गणित/विज्ञान, इतिहास/भूगोल) | एम.ए./एम.एस्सी., एम.एड्. (बी+) | 04 | – |
| 3 | शालेय (कला, संगीत, कार्यानुभव) अधिव्याख्याता | एम.एफ.ए./सी.टी.सी./संगीत विशारद | 01 | – |
| 4 | शारीरिक व आरोग्य शिक्षण अधिव्याख्याता | एम.पी.एड्. | 01 | – |
| 5 | ग्रंथपाल | एम्.लिब. | 01 | – |
| 6 | अधिक्षक (वरिष्ठ लिपीक) | बी.ए./बी.कॉम. (संगणक ज्ञान आवश्यक) | 01 | – |
| 7 | संगणक निर्देशक/भांडारपाल | बी.ए./बी.कॉम.,एम.सी.एस्. (एम.एस.सी.आय.टी.) | 01 | – |
| 8 | संगणक प्रयोगशाळा सहाय्यक | बी.ए./बी.कॉम. (एम.एस.सी.आय.टी.) | 01 | – |

टीप: 1) अनुभवी उमेदवारांना प्राधान्य.
2) वेतन व भत्ते NCTE आणि महाराष्ट्र शासन यांच्या नियमाप्रमाणे अनुज्ञेय राहील.
सचिव
शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर

ROHNY ELEVATORS PVT. LTD. Be safe with us...
Rise Karega India, Lift Karega Rohny!
भाई ने बोला Rohny Elevators का लिफ्ट इन्स्टॉल करने का तो करने का!
Now In Sangamner
Branches: Nashik I Ch. Sambhaji Nagar I Ahilya Nagar I Pimpri-Chinchwad
0253 2454140 / 7498292802
TOP TEN IMPERIAL
S-5 Second Floor, Sangamner, 422 605, Dist. Ahilyanagar
www.rohnyelevators.com

दर्शन टेक्सटाईल मार्केट
Men,s Polo Cotton T-shirt
फिट आहे - फ्रेश आहे
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605
DEVISH ADVERTISER - 9850983394

नक्की महाग काय मेडीक्लेमचा हफ्ता की हॉस्पिटलचे बिल ?
THINK हटके कडलग इन्व्हेस्टमेंट हैं ना !
भारतातील सर्व मेडिक्लेम पॉलिसी उपलब्ध !
म्युच्युअल फंड्स । एस.आय.पी. । सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन । टर्म लाईफ इन्शुरन्स । मेडीक्लेम
KADLAG INVESTMENT ...Dreams make sense...
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर,
9150 306 306
9142 559 000

NATURE EARTH RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
Hotel Nature Family Restaurant 8983220619
Khandarmal, Pune - Nashik Highway sangamner
Call : 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HALL RESTAURANT ROOMS CONFERENCE PAD
natureagroresort@gmail.com www.natureagroresort.com

कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • अ‍ॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५